मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २६० | बुधवार, ०३ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# राज्यातील ५५.७२ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटींची कर्जमाफी

## सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई :** राज्यातील अपुरा पाऊस आणि संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने आज मोठा निर्णय घेतला. विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मतदारांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारने आज राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीचा मोठा दिलासा दिला आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील सुमारे ५५ लाख ७० हजार शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी



रुपयांची कर्जमाफी देण्याची निर्णय मंत्रिमंडळ घेण्यात आला त्यानुसार २० जून पूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमाफीचे पैसे जमा करावेत आणि त्यांची खाती कर्ज खाती खुली करावीत असे आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी या बैठकीत सहकार विभागाला दिले. राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफीचा लाभ देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेवर आज मंगळवारी राज्यमंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब होण्याची शक्यता वर्तविली आहे. कर्जमाफीबाबतच्या सहकार विभागाच्या प्रस्तावावर मंत्रिमंडळ कोणता निर्णय घेते याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.सन २०२४च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान शेतकऱ्यांना खूष करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा केली होती. या योजनेच्या माध्यमातून ज्या शेतकऱ्यांचे ३० सप्टेंबर २५ पर्यंत पीक कर्ज थकीत आहे, त्यांना दोन लाखाच्या मर्यादेत कर्जमाफी देण्याची तसेच नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहन निधी देण्याची घोषणा केली होती.

# पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते ऍड प्रकाश बिनेदार यांचा वाढदिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवार १ जून रोजी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, नवीन पनवेल शहराध्यक्ष अमोल राजन जाधव आणि दिव्यांग सेल नवीन पनवेल अध्यक्ष प्रथमेश भगवान भंडारे यांच्या वतीने नवीन पनवेल, सेक्टर ६ येथील रुषिवन व रुपवन या दोन्ही वृध्दाश्रमात जावून सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या हस्ते वृध्द पुरुष-महिलांना फळे वाटण्यात आली.

यावेळी या दोन्ही वृध्दाश्रमाचे संचालक संतोष



पवार यांनी सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांचे शाल व पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा दिल्या व तेथील महिलांनी औक्षणही केले. यावेळी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे माजी सरचिटणीस प्रभाकर पवार, भाजपा उत्तर रायगड जिल्हा सदस्य श्याम साळवी, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, नवीन पनवेल शहराचे सरचिटणीस ॲड. शिवकुमार कांबळे, कोष्याध्यक्ष संतोष म्हस्के, सेलचे संयोजक विलास फडके, सागर येसनकर, जयेश कांबळे, साईनाथ भटकळ, अजिंक्य माने, भावेश बाईट, अनिकेत पंडीत, सुदेश तावडे, सुमित सकपाळ, कुणाल भंडारे आदि मान्यवर उपस्थित होते.

# सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या वाढदिवसानिमित्त फळे वाटप

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोमवार दि. १ जून २०२६ रोजी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, नवीन पनवेल शहराध्यक्ष अमोल राजन जाधव आणि दिव्यांग सेल नवीन पनवेल अध्यक्ष प्रथमेश भगवान भंडारे यांच्यावतीने नवीन पनवेल, सेक्टर ६ येथील रुषिवन व रुपवन या दोन्ही वृध्दाश्रमात जावून सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या हस्ते वृध्द पुरुष-महिलांना फळे वाटप करण्यात आली. यावेळी या दोन्ही वृध्दाश्रमाचे संचालक संतोष पवार यांनी सभागृह नेता ॲड. प्रकाश बिनेदार यांचे शाल व पुष्पगुच्छ देवून शुभेच्छा दिल्या व तेथील महिलांनी औक्षणही केले. यावेळी भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे माजी सरचिटणीस



प्रभाकर पवार, भाजपा उत्तर रायगड जिल्हा सदस्य श्याम साळवी, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा, नवीन पनवेल शहराचे सरचिटणीस ॲड. शिवकुमार कांबळे, कोष्याध्यक्ष संतोष म्हस्के, सेलचे संयोजक विलास फडके, सागर येसनकर, जयेश कांबळे, साईनाथ भटकळ, अजिंक्य माने, भावेश बाईट, अनिकेत पंडीत, सुदेश तावडे, सुमित सकपाळ, कुणाल भंडारे आदि मान्यवर उपस्थित होते.

# घाटंजी तालुका: १० ते १२ वर्षांपासून स्वखर्चातून पशु-पक्षांची तहान भागवणारे धनराज पवार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी - महेश पेन्दोर :** कडक उन्हाच्या वाढत्या झळांनी सध्या अंगाची लाहीलाही होत आहे. माणसांना जशी पाण्याची आस असते, तशीच अवस्था मुक्या जनावरांची आणि निष्पाप पक्ष्यांचीही होते. अशा या रखरखत्या उन्हात, घाटंजी तालुक्यातील घोटी येथील **धनराज पवार** हे गेल्या १० ते १२ वर्षांपासून या मुक्या जीवांचे 'देवदूत' बनून उभे ठाकले आहेत. कोणतीही सरकारी मदत किंवा गाजावाजा न करता, केवळ आणि केवळ निस्वार्थ भावनेने ते या जीवांची तहान भागवत आहेत.



जंगलाला लागून असलेल्या आपल्या शेताशेजारील रस्त्यावर धनराज यांनी तब्बल १ लाख रुपये स्वतःच्या खिशातून खर्च केले आहेत. तिथे त्यांनी एक बोरवेल खोदली, त्यावर सौरऊर्जा यंत्रणा बसवली आणि पाण्याचा एक मोठा टाका उभारला. या सौरऊर्जेच्या मदतीने टाक्यात अखंड पाण्याचा पुरवठा केला जातो, ज्यामुळे उन्हाळ्यात पाण्यासाठी भटकणाऱ्या वन्यप्राण्यांना, पक्षांना आणि पाळीव जनावरांना हक्काचा पाण्याचा स्रोत मिळाला आहे.

विशेष म्हणजे, या पाण्याच्या टाक्याजवळ लिंबाची मोठी आणि दाट झाडे आहेत. त्यामुळे मुक्या जीवांना थंडगार पाण्यासोबतच दिवसभर विश्रांतीसाठी शीतल सावलीही मिळते. पाणी आणि सावलीचा हा सुंदर संगम या परिसरात प्राण्यांसाठी जणू नंदनवनच ठरला आहे.

धनराज पवार यांच्या या दातृत्वाचा फायदा केवळ प्राण्यांनाच होतोय असे नाही, तर त्या रस्त्याने ये-जा करणारे वाटसरू आणि शेतात राबणारे शेतकरीही या थंडगार पाण्याचा मनसोक्त आस्वाद घेतात. रोजच्या धावपळीतून वेळ काढून धनराज स्वतः या व्यवस्थेची देखरेख करतात. त्यांच्या या अखंड सेवाभावातून आजच्या स्वार्थी जगात माणुसकीचे आणि सामाजिक बांधिलकीचे एक अतिशय प्रेरणादायी दर्शन घडत आहे. संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत असून, आपल्यासारखाच इतरांनीही उन्हाळ्यात मुक्या जीवांच्या मदतीसाठी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे.

# उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना जनजागर संघटनेचे निवेदन

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा -** जनजागर कला साहित्य बहू. संस्था साकोली च्या वतीने उमेश नंदागवळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत तथा सदस्य सचिव राजश्री शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन समिती भंडारा यांना कलावंतांच्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.त्यामध्ये सन 2025 26 मधील लाभार्थ्यांची निवड करण्यात यावी यासाठी निवेदन देण्यात आले. शासनाच्या नियमानुसार ज्या कलावंतांना 50 वर्ष पूर्ण झाली त्यांना शासनाकडून पाच हजार रुपये देण्यात येते. त्याकरिता त्यांना ऑनलाईन फॉर्म भरायला सांगून ते कलावंत आहेत त्यांचा पंधरा वर्षाचा पुरावा म्हणून



कलेच्या सादरीकरणाचे कागदपत्रे,पेपर कटिंग, फोटो ऑनलाइन करून फार्म पाठवावा लागतो परंतु दहा महिने होऊन सुद्धा त्या कलावंतांची निवड झालेली नाही. त्यामुळे सर्व कलावंत निवड यादीची वाट पाहत आहेत. प्रत्येकाला वाटते की माझी निवड झाली असावी या आशेने सर्व कलावंत वाट बघत आहेत त्यामुळे 2025 26 लाभार्थ्यांची यादी लवकरात लवकर प्रसारित करावी या संदर्भाचे निवेदन देण्यात आले.

तसेच 2021- 22, 22- 23, 23- 24 या वर्षातील ऑफलाइन पद्धतीने कलावंतांची निवड झाली. परंतु अद्याप त्यांना मानधन जमा होण्यासाठी कुठल्याच कागदपत्राची मागणी केली नाही. यासाठी चौकशी करून संबंधित निवड झालेल्या कलावंतांची कागदपत्रे मागवून त्यांच्या खात्यात मानधन जमा करावे हे सुद्धा निवेदनात नमूद केले आहे.निवेदन देताना जनजागर संघटनेचे अध्यक्ष भावेश कोटांगले, सदस्य लक्ष्मीकांत बोरकर आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन संवाद शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती पनवेल शाखेच्या वतीने एक दिवसीय *अंधश्रद्धा निर्मूलन संवाद शिबिर* आयोजित करण्यात आले होते. ३१ मे रोजी खांदा कॉलनी येथील आगरी शिक्षण संस्थेच्या विद्यालयात हे शिबिर पार पडले. शिबिरास राज्य सरचिटणीस आरती नाईक व रायगड जिल्हा प्रधान सचिव महेंद्र पाटेकर हे संवादक म्हणून उपस्थित होते. समितीचे काम करू इच्छिणारे तसेच, समितीचा विचार समजून घेऊ इच्छिणारे असे सर्वांसाठीच हे शिबिर



होते. शिबिरास पनवेल, नवी मुंबई परिसरातून उत्तम प्रतिसाद मिळाला. तरुणाईचा सहभाग मोठ्या प्रमाणावर होता.

अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम का करावे? संघटनेची पंचसूत्री, बुवाबाजी व वैज्ञानिक दृष्टिकोन, संघटनेची रचना, कार्यकर्त्यांच्या भूमिका इत्यादी मुद्द्यांवर या शिबिरात चर्चा झाली. वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटीज घेण्यात आल्या. गट चर्चा, खेळ यामाध्यमातून शिबिरार्थिनी विषय समजून घेतले. पनवेल शाखेच्या संस्कृतिक विभागाने चळवळीची दमदार गाणी सादर केली.

दिवसभराच्या शिबिरानंतर संघटनेचे प्रत्यक्ष काम करण्यासाठी सर्वच शिबिरार्थीनी उत्सुकता दाखवली. महाराष्ट्रात सातत्याने उघड होणारी बुवाबाजीची प्रकरणे, अस्थिर वातावरण यामुळे अंधश्रद्धा निर्मूलनासारख्या विवेकी चळवळींचे महत्व लोकांना पटू लागले आहे हे शिबिरातून जाणवले.

शिबिरास राज्य युवा सहभाग कार्यवाह प्रियंका खेडेकर, जिल्हा प्रशिक्षण विभाग प्रमुख मनोहर तांडेल, शाखा उपाध्यक्ष प्रा. राम गोसावी हेही उपस्थित होते. शिबिराचे सूत्रसंचलन शाखा कार्याध्यक्ष पूजा गोसावी हिने केले.

# रेवदंडा ग्रामपंचायतीत महायुतीला धक्का; शेकापचे संतोष उर्फ बाबू मोरे उपसरपंचपदी विराजमान

**दैनिक युवक आधार**
**अलिबाग निलेश फुंडे रेवदंडा प्रतिनिधी :** रेवदंडा ग्रुप ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाच्या निवडणुकीत राजकीय घडामोडींना वेग आला असून, महायुतीची संख्याबळाची बाजू मजबूत असतानाही शेतकरी कामगार पक्षाचे उमेदवार संतोष उर्फ (बाबू) सदाशिव मोरे यांनी ९ विरुद्ध ६ मतांनी विजय मिळवत उपसरपंचपदावर झेंडा रोवला आहे. एका मताची बाद नोंद झाल्याने या निवडणुकीची अधिकच चर्चा रंगली आहे.यापूर्वी ग्रामपंचायतीच्या उपसरपंच सौ. मंदा माणिक बळी यांचे अतिक्रमित बांधकाम प्रकरणी सदस्यत्व व उपसरपंचपद रद्द करण्यात आले होते. तसेच सौ. दीक्षा अजित बळी यांचेही सदस्यत्व रद्द झाल्याने उपसरपंचपदाची जागा रिक्त झाली होती. या प्रकरणात दि. २० एप्रिल २०२६ रोजी कोकण विभागीय आयुक्तांनी आदेश जारी केला होता. त्यानंतर आज (दि. २ जून) घेण्यात आलेल्या निवडणुकीकडे संपूर्ण रेवदंडा परिसराचे लक्ष लागले होते. या निवडणुकीत महाविकास आघाडी व शेकापचे उमेदवार संतोष उर्फ बाबू मोरे यांच्यासमोर महायुतीतर्फे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाचे सुराराम मोहनलाल माळी हे रिंगणात होते. मात्र मतदानाच्या वेळी राजकीय गणिते उलटल्याचे चित्र पाहायला मिळाले आणि बाबू मोरे यांनी अनपेक्षित विजय मिळवत महायुतीला मोठा धक्का दिला.

विशेष म्हणजे, ग्रामपंचायतीत



शिंदे गट व भाजपचे संख्याबळ तुलनेने मजबूत मानले जात असताना शेकापच्या उमेदवाराला मिळालेला हा विजय अनेक राजकीय प्रश्न निर्माण करणारा ठरला आहे. मतदानावेळी नेमकी कोणाची मते फुटली, कोणत्या गोटातून क्रॉस व्होटिंग झाले, याची चर्चा आता गणू गल्लीपासून ते नाक्या-नाक्यांपर्यंत रंगू लागली आहे.

राजकीय जाणकारांच्या मते, या विजयामागे संतोष उर्फ बाबू मोरे यांची स्थानिक पातळीवरील पकड, कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क आणि पडद्यामागील अचूक राजकीय डावपेच महत्त्वाचे ठरले. शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील, तसेच चित्रलेखा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाविकास आघाडीने आखलेली रणनीती यशस्वी ठरल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

या विजयासाठी सोनाली मोरे, प्रिती आशिष गोंधळी, मनीषा चुनेकर, सुरेश खोत, आशिष गोंधळी,अशोक नाईक, शरद वरसोलकर, शरद पाटील, खलील तांडेल, जनार्दन कोंडे, संदीप खोत, विजय चौलकर, निलेश गाडे, निलेश खोत, प्रमोद नवखारकर (बाळू), मिलिंद चुनेकर, मिलिंद वाडकर, राहुल गणपत, बंड्या जाधव, यांच्यासह महाविकास आघाडीच्या अनेक कार्यकर्त्यांनी मेहनत घेतल्याचे सांगितले जात आहे.

निवडणुकीचे कामकाज सरपंच प्रफुल्ल मोरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. तर ग्रामविकास अधिकारी सुदेश राऊत यांनी सचिव म्हणून निवडणूक प्रक्रिया सांभाळली.

दरम्यान, बाबू मोरे यांच्या निवडीचे ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले असून संपूर्ण रेवदंडा परिसरात आनंदाचे वातावरण आहे. फटाक्यांची आतषबाजी, मिठाई वाटप आणि अभिनंदनाच्या शुभेच्छांचा वर्षाव सुरू आहे.याचबरोबर ग्रामस्थांमध्ये आणखी एका मुद्द्याची चर्चा जोर धरू लागली आहे. रेवदंडा ग्रामपंचायत हद्दीत कथित अनधिकृत बांधकामे, विकासकामांतील पारदर्शकता, निधीच्या वापराबाबत निर्माण होणारे प्रश्न आणि जनतेच्या पैशाच्या योग्य उपयोगाबाबत नव्या उपसरपंचांनी ठोस भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. "ग्रामपंचायतीच्या नावावर होणाऱ्या कथित गैरप्रकारांना लगाम लावून ग्रामस्थांच्या हिताला प्राधान्य द्यावे," अशी भावना अनेक नागरिक व्यक्त करत आहेत.एकूणच, रेवदंडा ग्रामपंचायतीची ही उपसरपंच निवडणूक केवळ एका पदाची निवड राहिलेली नसून, स्थानिक राजकारणातील बदलत्या समीकरणांचा आणि भविष्यातील सत्तासंघर्षाचा ट्रेलर ठरत असल्याची चर्चा आता सर्वत्र रंगू लागली आहे. महायुतीच्या बालेकिल्ल्यात शेकापने मिळवलेला हा विजय आगामी राजकीय घडामोडींना नवी दिशा देणारा ठरू शकतो.

# नवी मुंबईत मेडिकव्हर हॉस्पिटलचे प्रौढांकरिता लसीकरण क्लिनिक

## न्यूमोकोकल, इन्फ्लूएंझा, टीडीएपी, एचपीव्ही, शिंगल्स आणि हिपॅटायटीस बी यांसारख्या लसी उपलब्ध करून देणार

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई :** प्रौढांमध्ये टाळता येण्याजोग्या संसर्गाची वाढती प्रकरणे लक्षात घेता खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलने नवी मुंबईत एक विशेष प्रौढ लसीकरण क्लिनिक सुरू केले आहे. या क्लिनिकचा उद्देश सामान्य आणि गंभीर संसर्गांविरुद्ध वेळीच लसीकरण करून प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देणे आहे, विशेषतः वृद्ध व्यक्ती आणि मधुमेह व श्वसनविकारांसारखे दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींमध्ये संसर्गाचा धोका करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

क्लिनिकच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. बादल शिवनारायण ताओरी(वरिष्ठ फिजिशियन, डायबेटोलॉजिस्ट आणि इंटेन्सिव्हिस्ट); डॉ. श्रीराम नवाडे(वरिष्ठ फिजिशियन, इंटेन्सिव्हिस्ट आणि डायबेटोलॉजिस्ट); डॉ. विजेता बागडे, (वरिष्ठ फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट); डॉ. पूजा परधी( फिजिशियन आणि डायबेटोलॉजिस्ट) आणि डॉ. प्रशांत डी. पुरकर (फिजिशियन) उपस्थित होते.

हल्लीच्या धावपळीच्या जीवनशैलीत, प्रौढ लसीकरणाकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते, कारण बऱ्याच लोकांना वाटते की लसीकरण केवळ लहान मुलांकरिताच गरजेचे असते. कालांतराने प्रतिकारशक्ती कमी होऊ शकते आणि प्रौढांमध्ये न्यूमोनिया, इन्फ्लूएंझा आणि शिंगल्स यांसारख्या संसर्गाचा धोका कायम राहतो. वाढते वय आणि सह-व्याधींमुळे(कौमॉर्बिडीटीज) गंभीर गुंतागुंत, रुग्णालयात दाखल होण्याची गरज आणि दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात. नव्याने सुरू झालेले हे क्लिनिक प्रौढांसाठी आवश्यक लसींबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्या सहज उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करते.

प्रौढ लसीकरण क्लिनिकमध्ये विविध प्रकारच्या लसी उपलब्ध आहेत, ज्यात न्यूमोनिया प्रतिबंधासाठी न्यूमोकोकल




लस, वार्षिक इन्फ्लूएंझा लस, टिटॅनस, डिप्थेरिया आणि डांग्या खोकल्यासाठी टीडीएपी (Tdap) बूस्टर डोस, गर्भाशयाच्या मुखाच्या कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी एचपीव्ही (HPV) लस, मज्जातंतू-संबंधित गुंतागुंत टाळण्यासाठी शिंगल्स लस आणि हिपॅटायटीस बी लस यांचा समावेश आहे, विशेषतः आरोग्य कर्मचारी आणि लसीकरण न झालेल्या व्यक्तींसाठी हे क्लिनिक वय, वैद्यकीय इतिहास आणि जोखमीच्या घटकांवर आधारित वैयक्तिकृत लसीकरण योजना देखील प्रदान करते.

आज प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेमध्ये प्रौढ लसीकरण खूप महत्त्वाची भूमिका बजावते, विशेषतः वृद्ध व्यक्ती आणि मधुमेह व सीओपीडी (COPD) सारखे आजार असलेल्यांसाठी. न्यूमोनियासारख्या गंभीर संसर्गांना प्रतिबंध करण्यासाठी या गटांमध्ये न्यूमोकोकल लसीसारख्या लसींची शिफारस केली जाते. पूर्वी, आम्ही पीसीव्ही १३ (PCV 13) आणि पीसीव्ही २३ (PCV 23) या लसी काही अंतराने आणि ठराविक कालावधीनंतर बूस्टर डोस देऊन देत असू, परंतु आता पीसीव्ही २० (PCV 20) सारख्या नवीन पर्यायांमुळे, वारंवार डोस घेण्याची गरज न भासता अधिक सोयीस्करपणे दीर्घकालीन संरक्षण देता येते. त्याच वेळी, इन्फ्लूएंझा लसीकरण तितकेच महत्त्वाचे आहे आणि ते आदर्शपणे दरवर्षी, शक्यतो पावसाळ्यापूर्वी घेतले पाहिजे, कारण फ्लूचे विषाणू दरवर्षी बदलत राहतात. टिटॅनस, डिप्थेरिया आणि पर्टुसिससाठी असलेला टीडीएपी (Tdap) बूस्टर डोस ही आणखी एक सामान्यतः दुर्लक्षित केली जाणारी लस आहे, जी प्रौढ वयात दर १० वर्षांनी घेतली पाहिजे. महिलांसाठी, एचपीव्ही (HPV) लसीकरण अत्यंत महत्त्वाचे आहे आणि गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग टाळण्यासाठी ते वयाच्या ४५ वर्षांपर्यंत दिले जाऊ शकते.

वृद्ध व्यक्ती आणि ज्यांची रोगप्रतिकारशक्ती कमी आहे अशा रुग्णांसाठी शिंगल्स लसीची देखील शिफारस केली जाते, कारण ती केवळ संसर्गच नव्हे, तर पोस्ट-हर्पेटिक न्यूराल्जियासारख्या दीर्घकालीन गुंतागुंतींना देखील प्रतिबंध करण्यास मदत करते, ज्यामुळे नसांमध्ये सतत वेदना होऊ शकतात. याव्यतिरिक्त, हिपॅटायटीस बी लसीकरण आवश्यक आहे, विशेषतः आरोग्य कर्मचारी आणि ज्यांनी यापूर्वी लसीकरण केलेले नाही त्यांच्यासाठी. एकंदरीत, आज आरोग्यसेवेतील दृष्टिकोन उपचारांपेक्षा प्रतिबंधाकडे अधिक झुकत आहे. प्रौढांचे वेळेवर लसीकरण सुनिश्चित करून, गंभीर संसर्ग, गुंतागुंत आणि रुग्णालयात दाखल होण्याचा धोका कमी करणे शक्य आहे, ज्यामुळे अखेरीस दीर्घकालीन आरोग्य आणि जीवनमान सुधारते. या क्लिनिकच्या माध्यमातून प्रौढ लसीकरणावर भर दिला जात असून ५०-६० वर्षांवरील व्यक्तींसाठी आणि ज्यांना आधीपासूनच आरोग्याच्या समस्या आहेत त्यांच्यासाठी हे लसीकरण नक्कीच फायदेशीर ठरेल. प्रतिबंधावर लक्ष केंद्रित केल्याने, टाळता येण्याजोग्या संसर्गामुळे होणारे रुग्णालयातील दाखल होणे, गुंतागुंत आणि आरोग्यसेवेवरील भार कमी करणे आवश्यक आहे.

प्रौढ लसीकरण क्लिनिक ही आमच्या आरोग्यसेवांमधील एक महत्त्वाची गरज आहे, ज्याचा उद्देश प्रौढांमधील लसीकरणाच्या महत्त्वाविषयी जागरूकता वाढवणे आहे. या उपक्रमाद्वारे, आम्ही अधिक प्रौढांना गंभीर संसर्ग टाळण्यासाठी आणि दीर्घकालीन आरोग्य समस्या दूर करण्यासाठी प्रोत्साहित करतो," *असे मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या महाराष्ट्र आणि कर्नाटक विभागाचे प्रादेशिक संचालक नीरज लाल म्हणाले.प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेची वाढती गरज लक्षात घेता, प्रौढ लसीकरण क्लिनिकचा शुभारंभ हा एक निरोगी समाज घडवण्याच्या दिशेने टाकलेले पाऊल आहे. वेळेवर लसीकरण आणि जनजागृतीला प्रोत्साहन देत, गंभीर संसर्गाचा धोका कमी करणे आणि जीवनाचा दर्जा सुधारणे, हे आमचे ध्येय आहे, *असे मेडिकव्हर हॉस्पिटल्स, नवी मुंबईचे केंद्र प्रमुख संदीप जोशी यांनी स्पष्ट केले.


# अनुसूचित जाती उपवर्गीकरण : सामाजिक न्याय की एका समाजाला लक्ष्य करण्याचा प्रयत्न? - अविनाश जाधव

**दैनिक युवक आधार**

**रायगड प्रतिनिधी :-सचिन पवार** : भारतातील अनुसूचित जाती समाजाचा इतिहास हा संघर्ष, अन्याय आणि स्वाभिमानाच्या लढ्याचा इतिहास आहे. हजारो वर्षांच्या सामाजिक गुलामगिरीनंतर भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जाती समाजाला आरक्षणाच्या माध्यमातून समानतेची संधी दिली. परंतु आज *"SC उपवर्गीकरण"* या नावाखाली अनुसूचित जातींमध्ये विभागणी निर्माण करण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना समाजात निर्माण झाली आहे.

विशेषतः महाराष्ट्रात या चर्चेमध्ये महार अथवा बौद्ध समाजाला लक्ष्य केले जात असल्याचे अनेकांना वाटते. समाजात असा प्रचार केला जातो की आरक्षणाचा सर्वाधिक लाभ एका समाजाने घेतला. मात्र वास्तव पाहिले, तर महार समाजाची प्रगती ही केवळ आरक्षणामुळे झालेली नाही; ती मुख्यतः शिक्षण, संघटन आणि सामाजिक जागृतीमुळे झाली आहे.

भारतरत्न Dr.B. R. Ambedkar यांनी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष



करा" हा संदेश दिला. त्या संदेशाचा सर्वाधिक प्रभाव महार/बौद्ध समाजावर झाला. शिक्षण हेच परिवर्तनाचे शस्त्र मानून हजारो कुटुंबांनी अत्यंत दारिद्र्य, उपासमार आणि अपमान सहन करत आपल्या मुलांना शिकवले. अनेकांनी मजुरी केली, जमीन विकली, उपाशी राहिले; पण शिक्षण सोडले नाही. त्यामुळे आज त्या समाजात काही प्रमाणात शासकीय अधिकारी, शिक्षक, वकील, अभियंते आणि कर्मचारी दिसतात.

ही प्रगती कोणाच्याही हक्कावर डाका टाकून झालेली नाही, तर कठोर संघर्षातून मिळवलेली आहे. म्हणून एका समाजाच्या प्रगतीकडे संशयाने पाहणे योग्य नाही. उलट, शिक्षण आणि जागृतीचा तो आदर्श इतर समाजांपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे.

***प्रगतीचा खरा मार्ग : शिक्षण***

कोणताही समाज केवळ आरक्षणामुळे मोठा होत नाही. आरक्षण ही संधी असते; पण त्या संधीचा उपयोग करण्यासाठी शिक्षण, जागरूकता आणि संघर्ष आवश्यक असतो.

महार/बौद्ध समाजाने मोठ्या प्रमाणावर शिक्षण स्वीकारले. वाचनालये, वसतिगृहे, स्पर्धा परीक्षा तयारी, सामाजिक चळवळी आणि बाबासाहेबांच्या विचारांचे अध्ययन यामुळे समाजात जागृती निर्माण झाली. त्यामुळे आज काही प्रमाणात प्रगती दिसते.

जर इतर घटक मागे असतील, तर त्यांनाही शिक्षण, प्रशिक्षण, शिष्यवृत्ती, मार्गदर्शन आणि संधी मिळाल्या पाहिजेत. पण त्यासाठी समाजात विभागणी करणे हा उपाय होऊ शकत नाही.

**59 अनुसूचित जातींना एकतेचे आवाहन**

महाराष्ट्रातील 59 अनुसूचित जातींनो,आपले प्रश्न वेगळे नाहीत... आपला संघर्ष समान आहे.

आज जर आपण एकमेकांविरोधात उभे राहिलो, तर आपल्या संविधानिक अधिकारांवर परिणाम होईल.एका समाजाला दोष देऊन दुसरा समाज पुढे जाणार नाही.कारण प्रगतीचा खरा मार्ग हा शिक्षण, संघटन आणि संघर्ष हाच आहे.

आज गरज आहे ती एकमेकांविषयी राग निर्माण करण्याची नाही, तर सर्व समाजांना शिक्षण आणि संधी मिळवून देण्याची आहे.दलित समाजाची ताकद ही त्याच्या ऐक्यात आहे.59 जाती वेगळ्या असल्या तरी स्वाभिमान, संविधान आणि सामाजिक न्याय ही आपली समान ओळख आहे.

चला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालत,"विभागणी नव्हे, शिक्षण आणि एकता"हा संदेश समाजात पोहोचवूया.कारण समाजाची खरी प्रगती ही संघर्षातून मिळालेल्या शिक्षणाने होते...आणि एकजूट हीच आपल्या अस्तित्वाची सर्वात मोठी ताकद आहे.आयु:अविनाश जाधव सामाजिक कारकर्ते

# धारावी पोलीस ठाण्याचा ६० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**धारावी, प्रतिनिधी:** धारावी पोलीस ठाण्याची स्थापना ३१ मे १९६५ रोजी मेन रोड धारावी येथील जुन्या पोलीस चौकीत झाली होती. लोकसंख्या विस्तारामुळे नंतर ९०फूट रोड येथे नव्याने सुसज्ज पोलीस ठाणे उभारण्यात आले. आज ३१मे रोजी धारावी पोलीस ठाण्याचा ६० वा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्त्यांकडून शुभेच्छा:

या निमित्ताने धारावी झोपडपट्टी पोलीस पंचायत, बीट दोन यांच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्यांनी दुपारी १२ वाजता वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. राजू बिडकर यांची सदिच्छा भेट घेतली. वर्धापन दिनानिमित्त त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते सन्मान:




यावेळी ज्येष्ठ नागरिक श्री. शंकर गोपी डे यांच्या हस्ते शाल आणि श्रीफळ देऊन व.पो.नि. बिडकर साहेबांना सन्मानित करण्यात आले. प्रमुख सल्लागार दिलीप गाडेकर, सदस्य अलका साबळे, सविता शेरखाने, अलका जठार आदी उपस्थित होते.

पोलिसांच्या कार्याचे कौतुक:

सदस्यांनी पोलिसांमार्फत नागरिकांची सुरक्षा होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. व.पो.नि. बिडकर यांनी भेट देणाऱ्या कार्यकर्त्यांचे कौतुक केले आणि पुढील सामाजिक कार्यास शुभेच्छा दिल्या.

तीन वर्षांची परंपरा:

मागील तीन वर्षांपासून ३१ मे रोजी धारावी झोपडपट्टी पोलीस पंचायत तर्फे पोलीस ठाण्याच्या वर्धापन दिनी शुभेच्छा देण्याचा उपक्रम राबवला जात आहे. याची विशेष नोंद घेण्यात आली.

# गायत्री बडेकर व रौनक जितेकर राज्य पॉवरलिफ्टिंग इक्विपड स्पर्धेत किताब विजेते

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** सिनियर,ज्युनिअर व सब ज्युनिअर , मास्टर्स पुरुष व महिला आणि अंध व गतिमंद दिव्यांग गटाची ईक्यूप्ड राज्य पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा २९ ते ३१ मे २०२६-वडाळा मुंबई या कालावधीत ज्ञानेश्वर विद्यालय वडाळा -मुंबई या ठिकाणी आयोजित करण्यात आली होती.

या राज्य स्पर्धेमध्ये रायगडच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सब ज्युनिअर महिला गटामध्ये गायत्री महेश बडेकर (आयएनडी क्लब, कर्जत) हिने सुवर्ण पदकासह "स्ट्रॉंग वुमन ऑफ महाराष्ट्र सब ज्युनिअर"आणि रौनक रोशन जितेकर (चेतन जिम, दापोली पारगाव) याने सब ज्युनिअर स्ट्रॉंग मॅन ऑफ महाराष्ट्र हा किताब पटकावला आहे. गायत्री बडेकर हिला राष्ट्रीय खेळाडू हनुमंत खरात आणि रौनक जितेकर याला विशाल मुळये (मुंबई उपनगर) यांचे मार्गदर्शन लाभले. या राज्य स्पर्धेत रायगडच्या खेळाडूंनी 4 सुवर्ण, 2 रौप्य आणि 1 कांस्य अशी एकूण 7 पदके आणि दोन किताब प्राप्त केले. रायगडच्या खेळाडूंचे या प्रगतीबाबत महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सचिव संजय प्रतापराव सरदेसाई यांनी समाधान व्यक्त केले. तसेच रायगड खेळाडूंच्या यशाबाबत संघ व्यवस्थापक संदीप कृष्णा पाटकर, सहाय्यक सुभाष टेंबे आणि प्रशिक्षक रामचंद्र सखाराम गावडे यांनी आनंद व्यक्त केला. पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगडचे अध्यक्ष गिरीश वेदक, सचिव अरुण पाटकर, सहसचिव सचिन भालेराव, सदस्य मानस कुंटे, कार्याध्यक्ष यशवंत मोकल, खजिनदार राहुल गजरमल यांनी खेळाडूंचे आणि त्यांच्या प्रशिक्षकांचे, या स्पर्धेसाठी प्रोत्साहन




देणाऱ्या खेळाडूंच्या पालकांचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

**या स्पर्धेत पदक विजेते खेळाडू पुढील प्रमाणे सुवर्णपदक--**

१) गायत्री महेश बडेकर(सुवर्णपदक सब ज्युनिअर, 47 किलो वजनी गट, आयएनडी कर्जत)

२)जान्हवी बडेकर (सुवर्णपदक, सब जुनिअर मुली ६९ किलो वजनी गट, आय एन डी क्लब कर्जत), ३)रौनक रोशन जितेकर (सुवर्णपदक, सब ज्युनिअर मुले 105 किलो वजनी गट, चेतन जिम दापोली पारगाव)

४)महेश कृष्णा पाटील (सुवर्णपदक, मास्टर २, 66 किलो वजनी )

**रौप्य पदक विजेते--**

१) अंजली येवले (रौप्य पदक, ज्युनियर 69 किलो वजनी गट, आय एन डी क्लब कर्जत)

२) रामचंद्र सखाराम गावडे (रौप्य पदक, मास्टर3, 60 वर्षावरील, वैयक्तिक)

**कांस्यपदक विजेते-**

यश गायकवाड (कांस्य पदक, ज्युनियर 105 किलो वजनी गट, आय एन डी कर्जत)

# आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेसाठी महेंद्रशेठ घरत जिनेव्हाला रवाना!

## जगभरातील १८७ देशांचे प्रतिनिधी संमेलनात सहभागी होणार

**दैनिक युवक आधार**

**उलवे,प्रतिनिधी :** स्वित्झर्लंडमधील जिनेव्हा येथे १ ते १२ जून या कालावधीत आयोजित आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) जागतिक त्रिपक्षीय शिखर परिषदेसाठी प्रसिद्ध कामगार नेते महेंद्रशेठ घरत रवाना झाले आहेत. संयुक्त राष्ट्रांची संलग्न संस्था असलेली 'आयएलओ' ही जागतिक स्तरावर कामगारांशी संबंधित कायदे संमत करणारी सर्वोच्च संस्था आहे. या संमेलनात जगातील १८७ सदस्य देशांचे शासकीय प्रतिनिधी, उद्योग जगताचे प्रतिनिधी आणि इंटरनॅशनल ट्रेड युनियन कॉन्फेडरेशन (ITUC) या जागतिक पातळीवरील सर्वात मोठ्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे प्रतिनिधी एकत्र येऊन विविध कामगार धोरणांवर चर्चा करणार आहेत.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना म्हणजेच आयएलओ ही संयुक्त राष्ट्रांची एक अत्यंत महत्त्वाची आणि सर्वात जुनी संस्था आहे. या संघटनेची स्थापना पहिल्या महायुद्धानंतर म्हणजेच १९१९ मध्ये झाली होती. जगभरातील कामगारांचे हक्क सुरक्षित करणे, त्यांच्यासाठी सन्मानजनक रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण देणे हे या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. आयएलओ ही जगातील एकमेव




अशी त्रिपक्षीय आंतरराष्ट्रीय संस्था आहे, जेथे सदस्य देशांचे सरकार, उद्योग जगताचे मालक आणि कामगार यांचे प्रतिनिधी एकाच व्यासपीठावर एकत्रितपणे कामगार धोरणे ठरवतात. या संघटनेद्वारे जागतिक पातळीवर कामगारांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या आर्थिक-सामाजिक सुरक्षिततेसाठी विविध नियम, करार आणि कायदे संमत केले जातात.

यापूर्वी जून २०१५ मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत महेंद्रशेठ घरत यांनी भारत सरकारचे प्रतिनिधी म्हणून अधिकृतपणे सहभाग घेतला होता. या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेत जागतिक पातळीवर 'प्लॅटफॉर्म वर्कर्स' आणि 'गिग वर्कर्स' या विषयावर विशेष चर्चा केली जाणार आहे. सध्याच्या बदलत्या डिजिटल युगात ऑनलाइन सेवा पुरवणारे आणि कंत्राटी पद्धतीने काम करणारे भारतीय प्लॅटफॉर्म कामगार, तसेच गिग वर्कर्स यांचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. या कामगारांच्या समस्या आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रभावीपणे मांडण्यासाठी, त्यांच्या न्याय्य हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि त्यांच्या मागण्यांविषयी जागतिक स्तरावर जाणीव निर्माण करण्यासाठी महेंद्रशेठ घरत यांनी आपल्या वाढदिवसासह सर्व पूर्वनियोजित कार्यक्रम रद्द केले असून ते तातडीने जिनेव्हासाठी रवाना झाले आहेत.

सध्याच्या इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या युगात जगभरात कामाचे स्वरूप वेगाने बदलत आहे. त्यातून प्लॅटफॉर्म वर्कर्स आणि गिग वर्कर्स हे दोन नवीन कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर समोर आले आहेत. प्लॅटफॉर्म वर्कर्स म्हणजे असे कामगार जे मोबाईल ॲप किंवा इंटरनेटवरील विविध डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ग्राहकांना थेट सेवा पुरवतात. यामध्ये प्रामुख्याने ऑनलाईन फूड डिलिव्हरी करणारे डिलिव्हरी बॉईज, ॲपवर आधारित टॅक्सी किंवा ऑटो चालक आणि विविध ॲप्सच्या माध्यमातून घरगुती सेवा पुरवणारे तंत्रज्ञ यांचा समावेश होतो. हे कामगार कोणत्याही एका विशिष्ट कंपनीचे कायमस्वरूपी नोकर नसतात, तर ते थेट डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून ग्राहकांशी जोडलेले असतात आणि प्रत्येक यशस्वी सेवेनुसार त्यांना मोबदला मिळतो.

गिग वर्कर्स ही संकल्पना प्लॅटफॉर्म वर्कर्सपेक्षा थोडी अधिक व्यापक आहे. कोणत्याही एका संस्थेमध्ये पारंपरिक आणि ठराविक वेळेची नऊ ते पाच अशी नोकरी न करता, केवळ ठराविक काळासाठी किंवा एका विशिष्ट प्रकल्पापुरते स्वतंत्रपणे काम करणाऱ्या व्यक्तींना गिग वर्कर्स म्हटले जाते. यामध्ये फ्रीलान्स काम करणारे लेखक, डिझायनर्स, सॉफ्टवेअर डेव्हलपर्स, सल्लागार किंवा तात्पुरत्या कंत्राटावर काम करणारे मजूर येतात. या दोन्ही प्रकारच्या कामगारांना त्यांच्या सोयीनुसार कामाचे तास ठरवण्याचे स्वातंत्र्य असले, तरी त्यांना भविष्य निर्वाह निधी, पेन्शन, पगारी सुट्ट्या, आरोग्य विमा किंवा नोकरीची शाश्वती यांसारखे कोणतेही पारंपरिक कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक फायदे मिळत नाहीत.

याच वाढत्या जागतिक समस्येवर आणि भारतीय कामगारांच्या न्याय्य हक्कांवर या वर्षीच्या आंतरराष्ट्रीय कामगार परिषदेत सविस्तर चर्चा होणार असून कामगार नेते महेंद्रशेठ घरत हे या घटकांचे प्रश्न जिनेव्हा येथील जागतिक व्यासपीठावर मांडणार आहेत.

# पनवेलमध्ये महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व मोफत तपासणी शिबिर ; ६६ महिलांनी घेतला लाभ

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : लोकनेते दि. बा. पाटील यांचे जन्मशताब्दी वर्ष व उर्मिला दि. बा. पाटील यांच्या जयंतीनिमित्त पनवेल-उरण आगरी समाज मंडळ पनवेल, राजस्थानी महिला मंडळ पनवेल आणि रुधिरसेतु सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आगरी समाज हॉल, पनवेल येथे महिलांसाठी कॅन्सर जनजागृती व मोफत कॅन्सर तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

महिलांमध्ये गर्भाशय मुखाचा कर्करोग व स्तनाचा कर्करोग याविषयी जनजागृती निर्माण करणे, वेळेवर निदानाचे महत्त्व पटवून देणे आणि प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीची सवय वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या शिबिरात एकूण ६६ महिलांनी सहभाग नोंदवून लाभ घेतला. सहभागी महिलांची ईसीजी तपासणी, Pap Smear तपासणी, स्तन कर्करोग तपासणी तसेच सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. यावेळी कर्करोग तज्ज्ञ डॉ. विवेक सुकुमार आणि डॉ. कस्तुरी बरुआ यांनी महिलांना कर्करोगाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, वेळेवर निदानाचे महत्त्व तसेच निरोगी जीवनशैली याबाबत मार्गदर्शन केले. तसेच महिलांना सेल्फ ब्रेस्ट चेक विषयी प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले.

शिबिराला पनवेलचे नगरसेवक परेश ठाकूर, नगरसेवक सुमित झुंजारराव यांनी सदिच्छा भेट दिली. त्यांनी शिबिरास भेट देऊन तपासणी



प्रक्रियेची माहिती घेतली तसेच उपस्थित महिला, वैद्यकीय तज्ज्ञ आणि स्वयंसेवकांशी संवाद साधला. महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या अशा उपक्रमांना समाजाचा मोठा प्रतिसाद मिळणे ही सकारात्मक बाब असल्याचे सांगत त्यांनी आयोजक संस्थांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पनवेल-उरण आगरी समाज मंडळ पनवेलचे सचिव बी. पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय द. गायकर, उपाध्यक्ष जे.डी. तांडेल, मेघा तांडेल, मनस्वी पाटेकर, मनिषा पाटील, विद्याधर, राजस्थानी महिला मंडळाच्या सुनंदा कोठारी, धनश्री बंथिया, पल्लवी मुनोत, तसेच रुधिरसेतु सेवा संस्थेचे सुरेश रिसबूड, डॉ. नरेंद्रकुमार दसरे, उन्मेष लोहार मनीषा बोरा, उज्वला भिसे आणि साम्य लोहार यांनी विशेष परिश्रम घेतले. शिबिरास उपस्थित महिलांनी या उपक्रमाचे कौतुक करत अशा आरोग्यविषयक शिबिरांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी आणि कॅन्सरविषयक जनजागृतीसाठी भविष्यातही अशा सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# विदर्भ केसरीला आमदारांचा आधार; विजयराज शिंदेंच्या महाराष्ट्र केसरी स्वप्नाला मिळाले नवे बळ!"

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम ग्रामीण भागातील प्रतिभावान खेळाडूंना योग्य संधी आणि आर्थिक पाठबळ मिळाल्यास ते राज्य, देश आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकदार यश मिळवू शकतात, याची प्रचिती पुन्हा एकदा आली आहे. वाशिम जिल्ह्यातील वारा जहागीर येथील विदर्भ केसरी विजयराज शिंदे यांच्या उल्लेखनीय क्रीडा कामगिरीचा गौरव करत वाशिम मंगरूळपीर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्यामभाऊ खोडे यांनी त्यांना दत्तक घेण्याचा ऐतिहासिक निर्णय जाहीर केला आहे.विदर्भ केसरी हा मानाचा किताब पटकावत विजयराज शिंदे यांनी केवळ आपल्या गावाचेच नव्हे तर संपूर्ण वाशिम जिल्ह्याचे नाव अभिमानाने उंचावले आहे. त्यांच्या अथक मेहनतीने, जिद्दीने आणि चिकाटीने अनेक तरुणांसमोर प्रेरणेचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाची दखल घेत आमदार श्यामभाऊ खोडे यांनी त्यांच्या पुढील क्रीडा कारकिर्दीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.ग्रामीण भागातील



अनेक खेळाडूंमध्ये अमाप क्षमता असते; मात्र आर्थिक अडचणी, सुविधा आणि मार्गदर्शनाच्या अभावामुळे त्यांची स्वप्ने अपूर्ण राहतात. अशा परिस्थितीत विजयराज शिंदे यांच्यासारख्या गुणवंत खेळाडूच्या पाठीशी उभे राहत आमदार खोडे यांनी केवळ आर्थिक मदतच नव्हे तर एक नवा आत्मविश्वास दिला आहे. त्यांच्या या निर्णयाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

विजयराज शिंदे यांच्यामध्ये भविष्यात महाराष्ट्र केसरी होण्याची क्षमता आणि गुणवत्ता असल्याचा विश्वास आमदार खोडे यांनी व्यक्त केला. त्यांच्या अंगी असलेली जिद्द, मेहनत आणि विजयी वृत्ती लक्षात घेऊन त्यांना आवश्यक ते प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि आर्थिक पाठबळ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

पुढील महिन्यात विजयराज शिंदे हे दिल्ली येथे विशेष सरावासाठी जाणार आहेत. त्या सरावासाठी आवश्यक आर्थिक मदत आमदार श्यामभाऊ खोडे यांच्या वतीने देण्यात आली आहे. याशिवाय जोपर्यंत विजयराज कुस्ती क्षेत्रात सक्रियपणे खेळत राहतील, तोपर्यंत त्यांना दरमहा ₹१०,००० इतकी आर्थिक मदत दिली जाणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, अनेक तरुण खेळाडूंना नवी प्रेरणा मिळाली आहे. राजकारणाच्या पलीकडे जाऊन

**"ग्रामीण भागातील प्रत्येक गुणवंत खेळाडूला संधी मिळाली पाहिजे. विजयराज शिंदे यांच्यासारख्या जिद्दी खेळाडूंच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे ही आपली सामाजिक जबाबदारी आहे. भविष्यात ते महाराष्ट्र केसरी बनून वाशिम जिल्ह्याचे नाव संपूर्ण राज्यात उज्ज्वल करतील, असा मला पूर्ण विश्वास आहे."**

**– आमदार श्यामभाऊ खोडे**
**वाशीम मंगरूळपीर**
**विधानसभा मतदारसंघ**

खेळाडूंच्या भवितव्यासाठी घेतलेला हा निर्णय समाजासाठी आदर्शवत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

विजयराज शिंदे यांची यशोगाथा आता नव्या उंचीवर झेपावण्यास सज्ज झाली असून, भविष्यात महाराष्ट्र केसरी तसेच राष्ट्रीय स्तरावरही ते चमकदार यश मिळवतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. वाशिम जिल्ह्याच्या मातीतून घडलेला हा कुस्तीपटू आता राज्यभर आपली वेगळी ओळख निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे.

# अकरावी–बारावी विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरीची अंमलबजावणी होणार का? देवणी तालुक्यात पालकांचे लक्ष

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका(प्रतिनिधी): पांडुरंग कदम** : शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून अकरावी-बारावी (कनिष्ठ महाविद्यालय) विद्यार्थ्यांसाठी बायोमेट्रिक पंचिंगद्वारे दररोज हजेरी बंधनकारक करण्याबाबत शिक्षण विभागाकडून नियम व सूचना जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर देवणी शहरासह ग्रामीण भागातील पालक वर्गाचे लक्ष अंमलबजावणीकडे लागले असून

देवणी तालुक्यातील अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी अकरावी-बारावीमध्ये प्रवेश घेतल्यानंतर एमएच-सीईटी (MHCET), जेईई (JEE), नीट (NEET) यासारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी उदगीर, लातूर आदी शहरांतील कोचिंग क्लासेसमध्ये नियमित उपस्थिती लावतात. डॉक्टर, अभियंता तसेच उच्च शिक्षणाचे स्वप्न पाहणारे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात कोचिंगकडे वळल्यामुळे सरासरी 80 टक्के विद्यार्थी महाविद्यालयात नियमित उपस्थित राहत नसल्याचे चित्र




दिसून येते.

विशेष म्हणजे, बीएससी व कॉमर्स शाखेतील विद्यार्थी तुलनेने नियमित महाविद्यालयात उपस्थित राहतात, मात्र विज्ञान शाखेतील अनेक विद्यार्थी कोचिंगवर अधिक भर देत असल्याने कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थिती कमी असल्याचे वास्तव आहे.

दरम्यान, शासन स्तरावर 75 टक्के उपस्थिती, बायोमेट्रिक हजेरी व CCTV रेकॉर्ड जतन यासंबंधी कडक भूमिका घेतली असेल तर. अशा परिस्थितीत देवणी तालुक्यात ग्रामीण भागापर्यंत या नियमांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होणार का, की फक्त कागदोपत्री नोंदीपुरती मर्यादित राहणार, याबाबत पालक व विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

**अंमलबजावणीवर नियंत्रण कोणाचे**

कनिष्ठ महाविद्यालयांमधील उपस्थिती, शैक्षणिक नियमांची अंमलबजावणी यावर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग, शिक्षण उपसंचालक कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच संबंधित कनिष्ठ महाविद्यालय प्रशासन यांचे नियंत्रण राहते. शासनाने कडक आदेश दिल्यास अनुपस्थिती, बनावट हजेरी किंवा नियमभंगावर कारवाईची शक्यता नाकारता येत नाही.

# १४ वर्षांच्या संघर्षाला यश; समाजसेवक रुपेश गोस्वामी यांना मानद डॉक्टरेट प्रदान

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे भंडारा :** आंबेडकरी चळवळ, सामाजिक न्याय आणि शिक्षण क्षेत्रात गेली १४ वर्षे सातत्याने कार्य करणारे समाजसेवक रुपेश गोस्वामी यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याची दखल घेत मानद डॉक्टरेट (Honorary Doctorate) प्रदान करण्यात आली. तसेच त्यांना "सोशल वर्क सन्मान" देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान नवी दिल्ली येथील रेडिएशन ब्लू मॅपल गोल्ड हॉटेल येथे आयोजित भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

रुपेश गोस्वामी यांनी गेल्या १४ वर्षांपासून समाजातील वंचित, शोषित आणि पीडित घटकांवर होणाऱ्या अन्याय, जातीय विषमता, सामाजिक असमानता आणि



अत्याचारांविरोधात सातत्याने लढा दिला आहे. गोरगरीबांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेकदा रस्त्यावर उतरून आंदोलने, निवेदने आणि जनजागृती अभियान राबविले. लोकांच्या हक्कांसाठी रात्रंदिवस झटताना त्यांनी स्वतःच्या जीवाचीही पर्वा केली नाही.

सामाजिक कार्यासोबतच शिक्षण क्षेत्रातही त्यांनी मोठे योगदान दिले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना स्वतःच्या खर्चातून शिक्षणासाठी मदत करणे, त्यांना मार्गदर्शन करणे आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे हे कार्य त्यांनी अविरतपणे सुरू ठेवले आहे. "शिक्षण हेच गरिबी, अन्याय आणि लाचारीवर मात करण्याचे प्रभावी शस्त्र आहे," या विचारावर त्यांचा दृढ विश्वास आहे.

स्वतः अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षणाच्या बळावर उभे राहिलेल्या रुपेश भाऊंनी अनेक गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची प्रेरणा दिली. गावोगावी, वस्ती-वस्त्यांमध्ये आणि पाड्यांमध्ये जाऊन त्यांनी शिक्षणाबाबत जनजागृती केली. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून सेवा करण्याच्या त्यांच्या ध्येयामुळे आज अनेक तरुणांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडून आला आहे.त्यांच्या या निस्वार्थ सामाजिक कार्याची, समाजसेवेची आणि शिक्षण प्रसाराच्या योगदानाची दखल घेत त्यांना मानद डॉक्टरेट बहाल करण्यात आली. या सन्मानामुळे सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेक युवकांना प्रेरणा मिळणार असल्याची भावना विविध स्तरांतून व्यक्त करण्यात येत आहे.

# खाजगी शाळांच्या मनमानीविरोधात रिपाइंचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल:प्रतिनिधी** : महाराष्ट्र शासनाच्या स्पष्ट आदेशांना केराची टोपली दाखवत पनवेल तालुक्यातील काही खाजगी शाळांनी पालकांना विशिष्ट दुकानातूनच महागडे गणवेश आणि शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती चालवली



आहे. काही शाळांनी त्यांच्या परिसरातच वह्या पुस्तके घेणे सक्तीचे केले आहे जी वह्या पुस्तके शासनाने दिलेल्या नियमानुसार बंधनकारक नाहीत मात्र तरीही शाळा आपल्या फायद्यासाठी सक्ती करीत आहेत यामुळे मोल मजुरी करणारे ,कामगार रिक्षाचाल अल्प उत्पन्न गटातील पालकांना नाईलाजास्तव पुस्तके वह्या बाजारात उपलब्ध अल्प किमतीपेक्षा चढ्या भावाने घ्याव्या लागत आहेत शाळांच्या या मनमानी कारभारामुळे पालकांची मोठी आर्थिक लूट होत असून, याविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (RPI) पनवेल शहर अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. या संदर्भात त्यांनी रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि पनवेलचे गट शिक्षण अधिकारी यांना लेखी निवेदन देऊन संबंधित शाळांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी १४ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार (क्र.प्रशिसं/संकीर्ण-८०२/माशाव्य/२०२६), कोणत्याही व्यवस्थापनाच्या किंवा माध्यमाच्या खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांना विद्यार्थ्यांना विशिष्ट दुकानातूनच गणवेश, पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच राज्य मंडळ, C.B.S.E., आणि I.C.S.E. मंडळाच्या शाळांनी NCERT / SCERT (बालभारतीची) पाठ्यपुस्तके वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे. कोणत्याही शाळेने विशिष्ट खाजगी प्रकाशनांच्या महागड्या पुस्तकांचा वापर करण्याचे बंधन विद्यार्थ्यांवर घालू नये, असे शासन आदेशात स्पष्ट म्हटले आहे.

**"शासन निर्णय अत्यंत स्पष्ट असतानाही पनवेल तालुक्यातील अनेक खाजगी शाळा प्रशासनाच्या आदेशाचा उघडपणे अवमान करत आहेत. पालकांवर प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे विशिष्ट दुकानातूनच अथवा शाळेतील स्टॉल वरून साहित्य घेण्याचा दबाव टाकला जात आहे. हा पालकांवर होणारा अन्याय असून शिक्षण विभागाने याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे."**

**— निलेश सोनावणे (शहर अध्यक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, पनवेल)**

या निवेदनाद्वारे सोनावणे यांनी मागणी केली आहे की, शिक्षण संचालनालयाच्या या आदेशाची पनवेल तालुक्यात काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी सर्व शाळांना तात्काळ कडक सूचना व आदेश निर्गमित करण्यात यावेत. तसेच, शासनाच्या नियमांचे उल्लंघन करून पालकांची लूट करणाऱ्या आणि मनमानी कारभार करणाऱ्या शाळांची तातडीने चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी. शिक्षण विभागाने यावर त्वरित पावले न उचलल्यास पालकांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही या वेळी देण्यात आला.पालकांना या सक्ती बाबत काही तक्रार असल्यास त्यानी ९९३०२३४३६३ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन देखील निलेश सोनावणे यांनी केले आहे

# सोयाबीन उत्पादनवाढीचा नवा मंत्र! पिंपळ्यात आत्मा व कृषी विभागाची शेती शाळा

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक व शास्त्रोक्त शेतीची दिशा देण्यासाठी आत्मा व कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने पिंपळा येथे सोयाबीन पिकावरील शेती शाळेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर घालणारा आणि उत्पादनवाढीचा नवा मार्ग दाखवणारा हा उपक्रम ठरला.

कार्यक्रमास गावच्या सरपंच राधाबाई संतोष ढंगारे, पंचायत समिती सदस्य जगदेवराव ढंगारे, तालुका कृषी अधिकारी श्री.देवकर साहेब, मंडळ कृषी अधिकारी श्री. तांबे, कृषी सहाय्यक इडोळे, कृषी सखी कल्पना दिलीप वानखडे तसेच गायत्री गणपत धोंगडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

शेती शाळेमध्ये सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक विजय दुधे यांनी सोयाबीन पिकाच्या सुधारित लागवड तंत्रज्ञानाबाबत शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यांनी बियाण्याची उगवणक्षमता तपासणी, बीज प्रक्रिया, योग्य वाणांची निवड, लागवडीचे शास्त्रोक्त अंतर, संतुलित खत व्यवस्थापन तसेच अधिक उत्पादन मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या आधुनिक तंत्रज्ञानाची



माहिती दिली.

यावेळी तालुका कृषी अधिकारी श्री.देवकर साहेब यांनी शेतकऱ्यांना दर्जेदार बियाण्यांचा वापर करण्याचा सल्ला देत शिफारशीनुसार बीज प्रक्रिया व वेळेवर लागवड केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते, असे सांगितले. मंडळ कृषी अधिकारी श्री. तांबे यांनी सुधारित सोयाबीन वाणांची माहिती देत बदलत्या हवामानाचा विचार करून शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे आवाहन केले.

कृषी सहाय्यक इडोळे यांनी विविध प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले. शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देत पिक व्यवस्थापनातील बारकावे समजावून सांगितले. त्यामुळे उपस्थित शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळाली.

शेती शाळेदरम्यान शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित वाण आणि शास्त्रोक्त व्यवस्थापनाच्या माध्यमातून सोयाबीन उत्पादनात वाढ कशी साधता येईल, याबाबत सविस्तर माहिती मिळाल्याने शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

आजच्या स्पर्धात्मक शेतीत केवळ परंपरागत पद्धतींवर अवलंबून न राहता विज्ञानाधारित शेतीचा स्वीकार करणे ही काळाची गरज आहे. याच उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही शेती शाळा शेतकऱ्यांसाठी ज्ञानाची पर्वणी ठरली. आत्मा व कृषी विभागाच्या या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून अधिक उत्पादनक्षम आणि शाश्वत शेतीकडे वाटचाल करण्याचा आत्मविश्वासही वाढला आहे.

**शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी संदेश..**

"शेतीत बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानाचा स्वीकार करणारा शेतकरीच भविष्यात यशस्वी ठरणार आहे. ज्ञान, नियोजन आणि आधुनिक व्यवस्थापन हीच समृद्ध शेतीची खरी गुरुकिल्ली आहे."

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षातील 'स्वर संध्या' सांगीतिक कार्यक्रमाने रसिकांना केले मंत्रमुग्ध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (हरेश साठे) :** माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य 'स्वर संध्या' या सांगीतिक कार्यक्रमाने पनवेल परिसरातील संगीतप्रेमी रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. "लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव वर्ष नियोजन समिती", "श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ" आणि नादब्रह्म साधना मंडळ खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि भारावलेल्या वातावरणात संपन्न झाला. संगीत, भक्ती आणि सांस्कृतिक परंपरेचा सुरेल संगम घडवून आणणाऱ्या या कार्यक्रमाला रसिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या प्रारंभी लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी, ह. भ. प. महादेवबुवा शाहबाजकर आणि ॲड. प्रसाद पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर संगीताच्या सुरेल मैफलीला प्रारंभ झाला. या कार्यक्रमाला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, महापौर नितीन पाटील, माजी सभागृहनेते व विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर, भाजपचे माजी शहराध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, रायगड भूषण पंडित उमेश चौधरी, नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर, पूनम ठाकूर, वसंतबुवा पाटील, जे. टी. पाटील, मनोहर मसणे, संतोष पाटील, अशोक पाटील, पं. तुषार चॅटर्जी, विलास खानावकर, करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे, स्वप्निल





ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर यांच्यासह संगीत क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या निमित्ताने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी समाजकारण, शिक्षण, संस्कृती आणि लोकसेवा या क्षेत्रांत दिलेल्या योगदानाचा गौरव करण्यात आला. त्यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त वर्षभर विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून 'स्वर संध्या' हा त्याचाच एक महत्त्वपूर्ण भाग ठरला.

या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या सारेगमप लिटल चॅम्प फेम गायिका अंजली गायकवाड आणि ज्ञानेश्वरी गाडगे यांनी आपल्या सुमधुर आणि प्रभावी गायनाने उपस्थितांची मने जिंकली. त्यांनी सादर केलेल्या भावगीत, भक्तिगीत, अभंग, तसेच लोकप्रिय गीतांना रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दोन्ही गायिकांनी आपल्या सुरेल आवाजातून निर्माण केलेल्या संगीतविश्वात रसिक तल्लीन झाले होते. पंडित प्रतापबुवा पाटील यांची उत्कृष्ट मृदुंग साथ, प्रसाद पाध्ये यांची तबला साथ तसेच सूर्यकांत सुर्वे यांचे प्रभावी तालवाद्य लाभले. या अनुभवी कलाकारांच्या समर्थ साथसंगतीमुळे संपूर्ण कार्यक्रमाची रंगत अधिक खुलली. स्वर आणि ताल यांचा अप्रतिम मिलाफ अनुभवताना रसिकांनी वारंवार दाद देत कलाकारांचा गौरव केला.

याशिवाय नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ कोपरा यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या भक्तिमय भजनांनी कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची प्राप्त करून दिली. गायिका शिवमाला पाटील यांनी आपल्या ओजस्वी आणि भक्तिरसपूर्ण गायनातून उपस्थितांना भक्तिमय वातावरणाची अनुभूती दिली. त्यांना पखवाज वादक निलेश पाटील आणि तबलावादक मिलिंद कडू यांची सुरेख साथ लाभली. भजनांच्या सादरीकरणादरम्यान सभागृहात भक्तिरसाची अनुभूती निर्माण झाली होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनोहर मडके यांनी आपल्या खास शैलीत प्रभावीपणे केले. त्यांनी कलाकारांची ओळख करून देतानाच कार्यक्रमातील प्रत्येक सादरीकरणाची वैशिष्ट्ये रसिकांसमोर उलगडून सांगितली.

अमृत महोत्सव वर्षाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या सांगीतिक सोहळ्याने संगीतप्रेमींसाठी अविस्मरणीय आठवणी निर्माण केल्या. दर्जेदार गायन, सुरेल वाद्यसंगत, भक्तिमय वातावरण आणि रसिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे 'स्वर संध्या' हा कार्यक्रम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षातील एक संस्मरणीय सांस्कृतिक पर्व ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजन समिती तसेच रायगड भूषण पं. उमेश चौधरी, नादब्रह्म साधना मंडळचे अक्षय चौधरी, वैभव चौधरी यांनी विशेष मेहनत घेतली. उपस्थितांनी आयोजनाबद्दल आयोजकांचे विशेष कौतुक केले. तसेच अशा सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे समाजात कला, संस्कृती आणि संगीताविषयीची जाणीव अधिक दृढ होत असल्याच्या भावना अनेक रसिकांनी व्यक्त केल्या.

# सावरगांव कान्होबा तील कागदी रोपवन घोटाळ्यामुळे प्रश्नांचे काहूर

## मानोरा वनपरिक्षेत्रातील इतर वनकामांवरही संशयाची सुई

**दैनिक युवक आधार**

**मानोरा नितीन पाटील तालुका प्रमुख :** मानोरा तालुक्यातील गिरोली वन वर्तुळातील सावरगाव कान्होबा कक्ष क्र. 138 मधील 30 हेक्टर मिश्र रोपवन घोटाळा उघड झाल्याने आता तालुक्यातील इतर वन वर्तुळांमध्ये झालेल्या कामांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

मागील काही दिवसांपासून गाजणाऱ्या या प्रकरणात तत्कालीन वनपरिक्षेत्र अधिकारी श्री जन्मेजय जाधव यांच्या कार्यकाळात कागदावर रोपवन दाखवून कोट्यवधीचा अपहार झाल्याचा आरोप पर्यावरणवाद्यांनी केला आहे. GPS फोटो व अनेक वृत्तपत्रांच्या बातम्यांनी आरोपांना दुजोरा दिला आहे.त्यामुळे श्री जाधव यांच्या कार्यकाळात मानोरा तालुक्यातील इतर कोणत्या वन वर्तुळातील, कोणत्या गावांमध्ये अशाच प्रकारे कागदी योजना राबवून शासनाची फसवणूक झाली आहे का? याचीही स्वतंत्र चौकशी होऊन सत्य जनतेसमोर यावे, अशी चर्चा आता तालुक्यातील नागरिकांमध्ये जोर धरू लागली आहे.



वाढते तापमान कमी करण्यासाठी घटते, पर्जन्यमान वाढविण्यासाठी शासन वनांचा टक्का वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे. हरित महाराष्ट्र आयोगाची निर्मिती करीत आहे, मात्र काही झारीतील शुक्राचार्य असलेले वनाधिकारी शासनाच्या या उदात्त धोरणाला सुरुंग लावून स्वतःची आर्थिक हित साधण्यासाठी कागदी रोपवान योजना राबवून शासनाची वजाबाकी योजना राबविली त्या भागातील नागरिकांची फसवणूक करीत असल्याचे यानिमित्ताने उजागर होत आहे.

# रेन्यूसिस सोलर कंपनी वरून जांभिवलीत संघर्ष पेटला!

## कंपनीविरोधी जाणाऱ्यांना उपोषणाला सरपंचांचा थेट इशारा

**दैनिक युवक आधार**

**खालापूर तालुका संतोष शेवाळे :** अजिवली येथील रेन्यूसिस इंडिया प्रा. लि. कंपनीविरोधात ३ जून रोजी प्रस्तावित आमरण उपोषणाच्या पार्श्वभूमीवर जांभिवली ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद शिर्के यांनी सोमवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत कंपनीच्या समर्थनार्थ ठाम भूमिका घेतल्याने परिसरातील वादाला नवे वळण मिळाले आहे. उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, "कंपनीविरोधी आंदोलन सुरू झाल्यास आम्हीही कंपनीच्या समर्थनार्थ प्रति-आंदोलन छेडू," असा थेट इशारा त्यांनी दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना शिर्के म्हणाले की, रेन्यूसिस कंपनीमुळे केवळ जांभिवली नव्हे तर खालापूर, कर्जत, पेणआणि पाली परिसरातील शेकडो युवकांना रोजगार मिळाला आहे. स्थानिक ठेकेदारांना कामे देण्यात आली असून अनेक कुटुंबांची उपजीविका कंपनीवर अवलंबून आहे. अशा



परिस्थितीत काही मोजक्या व्यक्तींनी कंपनीविरोधी भूमिका घेणे योग्य नसल्याचे त्यांनी सांगितले.

"इंडोस्पेसकडून ग्रामपंचायतीला कर मिळतो, तर रेन्यूसिसकडून स्थानिकांना रोजगार मिळतो. कंपनीने स्थानिकांना नोकऱ्या, उद्योगधंदे आणि ठेकेदारीच्या संधी दिल्या आहेत. कंपनी गेली तर हजारो लोकांच्या रोजगाराचे काय होणार?" असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

यावेळी त्यांनी आंदोलनकर्त्यांवर गंभीर आरोप करत, "ज्या लोकांच्या नावावर स्वतः ठेके आणि कामे आहेत, तेच आज कंपनीविरोधात आंदोलन करत आहेत. प्रत्येक कुटुंबाला स्वतंत्र ठेका देणे शक्य नसताना कंपनीवर अन्यायकारक आरोप केले जात आहेत," असे म्हटले.

दरम्यान, ३ जून रोजी कंपनीविरोधी आमरण उपोषण सुरू झाल्यास त्याच दिवशी कंपनीच्या समर्थनार्थ ग्रामस्थ रस्त्यावर उतरतील, अशी घोषणा सरपंचांनी केली. त्यामुळे रेन्यूसिस कंपनीच्या मुद्द्यावर आता गावात दोन स्पष्ट गट पडल्याचे चित्र निर्माण झाले असून, उपोषण आणि प्रति-आंदोलनामुळे परिसरातील वातावरण तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

राजकीय पक्ष आणि स्थानिक नेत्यांनी या वादात हस्तक्षेप न करता रोजगार व उद्योगधंदे टिकवण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहनही शिर्के यांनी केले.

३ जून रोजी कंपनीविरोधी उपोषण आणि त्यासमोर कंपनी समर्थकांचे प्रति-आंदोलन होणार असल्याने प्रशासनासमोर कायदा व सुव्यवस्थेचे आव्हान निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

यावेळी इक्बाल खोत, अजित खोत, भूषण वंदे, कमरुधीन पटेल, रिझवान शेख,आरिफ पटेल, अफान खोत, इम्तियाज खोत, सुनील वावबत, संदेश विचारे, विशाल दळवी, शशिकांत विचारे, निशीकांत घाडगे, मंगेश कदम मोहन घाडगे, पद्माकर कदम, सागर आंब्रे, अजित दळवी, नरेंद्र दळवी, शरद मालुसरे, दिनेश वाघमारे, दिनेश मोरे, दिपक मोरे, प्रमोद मोरे, मंगेश कदम, निशिकांत घाडगे आदी स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# अंडरपासच्या रखडलेल्या व नियोजनशून्य कामाविरोधात ग्रामस्थांचा संताप; सीमा कन्स्ट्रक्शन कंपनीला घेराव

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे :** लाखनी तालुक्यातील मानेगाव सडक येथील राष्ट्रीय महामार्गावरील अंडरपास व पुलाच्या रखडलेल्या तसेच नियोजनशून्य कामामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी शनिवारी सीमा कन्स्ट्रक्शन कंपनीच्या कार्यालयावर धडक देत अधिकाऱ्यांना घेराव घातला. पहिल्याच पावसात कंपनीच्या कामकाजातील त्रुटी उघड झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

30 मे रोजी झालेल्या पावसामुळे परिसरातील पाण्याचा निचरा न झाल्याने अनेकांच्या घरात पाणी शिरले. यामुळे संतप्त झालेल्या महिला व पुरुषांनी सरपंच आशा सिंगनजुडे यांच्या नेतृत्वाखाली कंपनी प्रशासनाला जाब विचारला.



गेल्या सहा महिन्यांपासून अंडरपास आणि पुलाचे काम संथ गतीने सुरू असून पावसाळ्यापूर्वी आवश्यक उपाययोजना करण्यात कंपनी अपयशी ठरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला.

स्थानिक तलाव ओव्हरफ्लो झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाणी या भागात येते. मात्र या पाण्याचा निचरा करण्यासाठी कोणतीही प्रभावी व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.अंडरपाससाठी सुमारे 30 ते 35 फूट खोल खोदकाम करण्यात आल्याने

> **"सहा महिने उलटूनही कंपनी नागरिकांच्या समस्या सोडविण्यास तयार नाही. आज आम्ही त्यांना परिस्थितीची जाणीव करून दिली आहे. लवकरात लवकर प्रश्न मार्गी लागले नाहीत तर मोठे आंदोलन उभारण्यात येईल."**
>
> **— योगेश सिंगनजुडे, ग्रामस्थ**
>
> **"सर्व्हिस रोडवरील धूळ नियंत्रणासाठी नियमित पाणी मारणे, पाण्याचा निचरा करणे तसेच इतर तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील. पुलाचे बांधकाम एका महिन्याच्या आत पूर्ण करण्याचा प्रयत्न करू."**
>
> **— सुमित त्यागी, सुपरवायझर, सीमा कन्स्ट्रक्शन कंपनी**

रस्त्यालगतच्या व्यावसायिक व निवासी इमारतींच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. इमारतींचे पाय कमकुवत होऊन त्या कोसळण्याचा धोका असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली. तसेच पुलाचे काम अपूर्ण असल्याने गावाचे दोन भाग पडल्यासारखी परिस्थिती निर्माण झाली असून नागरिकांना एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला जाण्यासाठी तब्बल एक ते दीड किलोमीटरचा फेरा मारावा लागत आहे.

महामार्गावरील सर्व्हिस रोडचे कामही अद्याप पूर्ण झालेले नाही. कच्च्या रस्त्यावर नियमित पाणी न मारल्यामुळे दिवसभर मोठ्या प्रमाणात धूळ उडत असून वाहनचालकांना समोरील रस्ता दिसेनासा होतो. परिणामी या भागात वारंवार लहान-मोठे अपघात घडत असल्याने नागरिक आणि प्रवासी त्रस्त झाले आहेत.शनिवारी दुपारी मोठ्या संख्येने ग्रामस्थ कंपनीच्या कार्यालयाबाहेर जमा झाले. यावेळी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी अनुपस्थित असल्याने ग्रामस्थांचा संताप आणखी वाढला. उपस्थित सुपरवायझरला घेराव घालत नागरिकांनी विविध समस्यांकडे लक्ष वेधले आणि तातडीने उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला.

## निधन वार्ता



**दैनिक युवक आधार**

**बागलाण तालुका प्रतिनिधी -दीपक गायकवाड :** ता.२,मुल्हेर ता.बागलाण येथील सुप्रसिद्ध हॉटेल रामजीवन यांचे संचालक,अप्रतिम तबला वादक मुरलीधर रामचरण शर्मा यांचे मंगळवार रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा,नातू गणेश, कृष्णा,सुनबाई, नाती असा परिवार असून देवेंद्र शर्मा यांचे वडील होत.

# वडनेरभैरव अत्याचार प्रकरण : आरोपी शिक्षकास ३ जूनपर्यंत वाढीव पोलिस कोठडी

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** चांदवड तालुक्यातील वडनेरभैरव येथील शालेय विद्यार्थीनीवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी शिक्षक मन्सुर सादिक मणियार यास निफाड येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयाने ३ जूनपर्यंत वाढीव पोलिस कोठडी सुनावली आहे. तपासादरम्यान आणखी महत्त्वाचे पुरावे आणि डिजिटल स्वरूपातील माहिती हस्तगत करण्यासाठी पोलिसांनी वाढीव कोठडीची मागणी केली होती.या प्रकरणात वडनेरभैरव येथील शाळेत शिक्षण घेणाऱ्या १३ वर्षीय अल्पवयीन विद्यार्थिनीचे आक्षेपार्ह फोटो आणि व्हिडिओ चित्रित करून त्याच्या आधारे तिला धमकावल्याचा आरोप शिक्षक मन्सुर सादिक मणियार यांच्यावर आहे. या संदर्भात वडनेरभैरव पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांसह बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण (पॉक्सो) अधिनियम आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला २८ मे रोजी अटक केली होती. त्यानंतर न्यायालयाने त्याला १ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. कोठडीची मुदत संपल्यानंतर सोमवारी (१ जून) तपास अधिकारी पोलिस निरीक्षक कैलास वाघ यांनी आरोपीला निफाडच्या विशेष जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले.सरकार पक्षातर्फे सहायक जिल्हा सरकारी वकील ॲड. रामनाथ शिंदे यांनी न्यायालयात बाजू मांडताना आरोपीकडून सखोल चौकशी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. प्रकरणाशी संबंधित अन्य महत्त्वाचे डिजिटल पुरावे, फुटेज तसेच तपासासाठी आवश्यक माहिती हस्तगत करणे बाकी असल्याने वाढीव पोलिस कोठडी देण्याची गरज असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला. तसेच गुन्ह्याचे गांभीर्यही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपी मन्सुर सादिक मणियार यास ३ जूनपर्यंत वाढीव पोलिस कोठडी सुनावली. दरम्यान, या संवेदनशील प्रकरणाचा तपास पोलिसांकडून सुरू असून पुढील तपासात आणखी माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## कडापे गावात जलजीवन नळ पाणी योजनेचा शुभारंभ; ग्रामस्थांचे 'अमृताचे' स्वप्न अखेर सत्यात!



**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** "जल आहे म्हणून या भूतालावर जीवसृष्टी आहे." पाण्याला जीवनाचा मुख्य आधार मानले जाते. मात्र, गेली अनेक वर्षे आणि दशके पाण्यापासून वंचित राहिलेल्या उरण तालुक्यातील कडापे गावाला पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागला. गावात नळाने पाणी येईल, हे येथील लोकांसाठी एका स्वप्नासारखे होते. पण अखेर कडापे ग्रामस्थांच्या संयमाला आणि प्रयत्नांना यश आले असून गावकऱ्यांचे हे स्वप्न सत्यात उतरले आहे.

रविवार, दिनांक ३१ मे २०२६ रोजी कडापे गावात 'जलजीवन नळ पाणी योजनेचा' भव्य शुभारंभ अत्यंत उत्साहात संपन्न झाला. आठ गाव पाणी कमिटीचे नवनियुक्त अध्यक्ष व जिल्हा परिषद सदस्य अविनाश ठाकूर, आठ गाव पाणी कमिटीच्या माजी अध्यक्ष तथा वशेणी ग्रामपंचायत सरपंच अनामिका म्हात्रे, आवरे ग्रामपंचायत सरपंच निराबाई पाटील, हितेंद्र म्हात्रे सर आणि सर्व आठ गाव पाणी कमिटी सदस्यांच्या विशेष प्रयत्नातून हा पाण्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.

अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अखेर कडापे गावात नळाचे पाणी आले. पाणी गावात पोहोचताच सर्व ग्रामस्थ आणि विशेषतः महिला भगिनींच्या चेहऱ्यावर आनंदाश्रू आणि समाधान पाहायला मिळाले. याप्रसंगी कडापे पाणी कमिटीचे अध्यक्ष संतोष म्हात्रे, सचिव सरिता प्रशांत म्हात्रे, कमिटीचे सर्व सदस्य, कडापे गावचे ग्रामस्थ आणि महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.कडापे गावातील पाण्याचा गंभीर प्रश्न सोडवल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने आठ गाव पाणी कमिटीचे आभार मानण्यात आले. तसेच पाणीपुरवठा कमिटीचे अध्यक्ष संतोष म्हात्रे, सर्व सदस्य आणि गावातील महिला भगिनी अथक परिश्रमाचे कौतुक करत कडापे ग्रामस्थांच्या वतीने सर्वांच्या हार्दिक अभिनंदन करण्यात आले या ऐतिहासिक क्षणाचे नेटके सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन कडापे गावातील आदर्श शिक्षक अशोक म्हात्रे सर यांनी केले.

# राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**शिरसोली, प्रतिनिधी :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त ज्ञानविकास क्लासेस, शिरसोली यांच्या वतीने शिवराय चौक, शिरसोली येथे विद्यार्थ्यांसाठी भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले.



कार्यक्रमाची सुरुवात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या महान कार्याचा गौरव करत विद्यार्थ्यांना त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे आवाहन केले.

स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण, स्वच्छता, निसर्ग, सामाजिक विषय तसेच ऐतिहासिक वारसा यांसारख्या विविध विषयांवर आकर्षक व संदेशात्मक चित्रे रेखाटली. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेने आणि कलात्मकतेने उपस्थितांची मने जिंकली. अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट चित्रकला सादर करून आपल्या कलागुणांचा ठसा उमटविला.

या कार्यक्रमादरम्यान मनीष पाटील सर, आरती पाटील मॅडम आणि चंचल पाटील मॅडम यांनी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनचरित्रावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांनी अहिल्यादेवी होळकर यांचे समाजकारण, न्यायप्रिय प्रशासन, धार्मिक कार्य, जनकल्याणकारी धोरणे तसेच देशभरातील मंदिर, घाट, विहिरी आणि धर्मशाळांच्या उभारणीत त्यांनी दिलेले योगदान याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचा आदर्श घेण्याचे आवाहन करण्यात आले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ज्ञानविकास क्लासेसचे संचालक मनीष पाटील सर, निकिता सचिन पाटील मॅडम, निकिता संदीप पाटील मॅडम, चंचल पाटील मॅडम, आरती पाटील मॅडम, लोकेश बारी तसेच राजेश पाटील सर यांनी विशेष परिश्रम घेतले. स्पर्धेचे नियोजन, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन आणि संपूर्ण कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी यासाठी सर्वांनी मोलाचे योगदान दिले.

तसेच स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सचिन पाटील यांनी विशेष मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे कार्यक्रमाचे नियोजन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गावातील अनेक नागरिकांनीही मोलाचे सहकार्य केले. यामध्ये ज्ञानेश्वर रमेश पाटील (वायरमन), ज्ञानेश्वर रमेश पाटील (ग्रामपंचायत क्लार्क), शेनफडू आबा पाटील, अनिल बारकू पाटील, अनिल महारू पाटील, भगवान दगा पाटील, पंढरीनाथ नारायण पाटील, ज्ञानेश्वर सुरेश पाटील तसेच भगवान परबत पाटील यांनी विशेष सहकार्य करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी योगदान दिले.

यावेळी गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी ज्ञानविकास क्लासेसच्या या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांमध्ये कला, संस्कार, सामाजिक जाणीव आणि ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमान निर्माण करण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

> **कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी भविष्यातही अशा विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि कलात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.**
>
> **– ज्ञानविकास क्लासेस, शिरसोली**
> **"गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि सर्वांगीण विकासासाठी सदैव कटिबद्ध."**

# पेरणीची घाई नको! हवामान विभागाचा शेतकऱ्यांना मोलाचा सल्ला !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोला प्रतिनिधी:** राज्यात मान्सूनच्या आगमनाची चाहूल लागली असून, काही भागांत मान्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली आहे. या पार्श्वभूमीवर बळीराजा शेतीच्या कामाला लागला असून पेरणीची तयारी सुरू झाली आहे. मात्र, हवामान विभाग आणि कृषी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना एक अत्यंत महत्त्वाचा सल्ला दिला आहे: "पेरणीची घाई नको!"

निसर्गाचा लहरीपणा आणि सुरुवातीच्या पावसातील खंड पाहता, पुरेशा पावसाशिवाय केलेली पेरणी उलटण्याची भीती कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

कृषी तज्ज्ञांच्या मते, केवळ एका किंवा दोन मान्सूनपूर्व पावसाच्या सरींवर विसंबून पेरणी करणे धोक्याचे ठरू शकते.

जमिनीमध्ये पुरेशी ओल निर्माण होण्यासाठी किमान ७५ ते १०० मिलिमीटर (मीमी) पावसाची नोंद होणे आवश्यक आहे. ओल किमान ६ ते ७ इंच खोल



गेल्यावरच बियांची उगवण क्षमता चांगली राहते.

कमी पाऊस असताना पेरणी केल्यास, बियाणे करपून जाण्याचा किंवा दुबार पेरणीचे संकट ओढवण्याचा मोठा धोका असतो.

हवामान विभागाने मान्सूनचा जोर वाढल्याचा अंदाज दिल्यानंतरच प्रत्यक्ष पेरणीला सुरुवात करावी. आपल्या जमिनीच्या प्रकारानुसार आणि हवामानाचा अंदाज घेऊनच प्रमाणित बियाण्यांची निवड करा.पेरणीपूर्वी बियाण्यांवर बुरशीनाशक आणि आवश्यक बीजप्रक्रिया नक्की करा, ज्यामुळे रोगांचा प्रादुर्भाव कमी होईल. पेरणीच्या वेळी रासायनिक खतांचा योग्य डोस द्या, मात्र पाऊस नियमित सुरू झाल्यावरच नत्रयुक्त खतांचा वापर वाढवा.

"अनेकदा शेतकरी मान्सूनच्या पहिल्याच पावसावर पेरणी उरकून घेतात. पण जर त्यानंतर पावसाने १०-१५ दिवसांचा खंड दिला, तर बियाणे मातीआड वाया जाते. शेतकऱ्यांनी आर्थिक नुकसान आणि मानसिक त्रास टाळण्यासाठी जमीन पूर्णपणे ओली होईपर्यंत संयम बाळगावा."

हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, यावर्षी मान्सून वेळेवर आणि चांगला होणार असला, तरी सुरुवातीच्या टप्प्यात सावधगिरी बाळगणेच शेतकऱ्यांच्या हिताचे ठरेल.खरीप हंगामामध्ये अल-निनोच्या पार्श्वभूमीवर कमी व असमान पावसाचा अंदाज असून मान्सूनपूर्व वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये. ७५ ते १०० मी.मी पाऊस झाल्यानंतरच पेरणीचे नियोजन करावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघ महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी पाच उमेदवारांचे सहा अर्ज

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघातून महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी आज दि. १ जून रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत पाच उमेदवारांचे सहा नामनिर्देशनपत्र दाखल करण्यात आले. यात राजीव पोतदार (भारतीय जनता पार्टी), राजेश जंगले (अपक्ष), सुरेंद्र लोही (अपक्ष), दिनेश ढोले (इंडियन नॅशनल काँग्रेस), अतुल लोंढे (इंडियन नॅशनल काँग्रेस) या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल केले आहेत. यात भारतीय जनता पार्टीकडून राजीव पोतदार यांनी दोन नामनिर्देशनपत्र दाखल केली आहेत.

नागपूर स्थानिक प्राधिकारी मतदार संघ महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीसाठी 25 मे 2026 रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवार दि. 1 जून होती. अर्जांची छाननी मंगळवार,दि. 2 जून



रोजी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख गुरूवार दि. 4 जून आहे. या पोटनिवडणुकीसाठी मतदान गुरूवार दि. 18 जून रोजी होत असून सकाळी 8 ते दुपारी 4 वाजेपर्यंत मतदान होणार आहे. मतमोजणी सोमवार, दि. 22 जून रोजी करण्यात येईल.

# ओझर येथील स्वामी समर्थ केंद्रातील दानपेटी चोरीचा गुन्हा उघड

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; आरोपी अटकेत, विधीसंघर्षित बालकाचा सहभाग उघड

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : ओझर शहरातील बाजारपेठ परिसरातील स्वामी समर्थ केंद्रातून दानपेटी चोरी करणाऱ्या आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने अटक करून गुन्ह्याचा यशस्वी छडा लावला आहे. या प्रकरणात एका विधीसंघर्षित बालकाचाही सहभाग असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओझर येथील स्वामी समर्थ केंद्रातून २९ मे २०२६ रोजी चौकोनी आकाराची लोखंडी दानपेटी व त्यामधील सुमारे १५ हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्यांनी लंपास केली होती. याप्रकरणी ओझर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११३/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असताना पथकाने मंदिर परिसरातील तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी ओंकार देविदास जाधव (वय २०, रा. दत्तनगर, शेलारमळा, ओझर, ता. निफाड) यास ताब्यात घेतले.

चौकशीदरम्यान ओंकार जाधव याने एका विधीसंघर्षित बालकाच्या मदतीने स्वामी समर्थ केंद्रातील दानपेटी चोरी केल्याची कबुली दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून चोरीस गेलेली लोखंडी दानपेटी तसेच १ हजार ४० रुपये रोख रक्कम जप्त केली आहे.



तपासात आरोपीने चोरीतील उर्वरित रक्कम नवीन कपडे व शूज खरेदीसाठी खर्च केल्याचेही उघड झाले. त्यानंतर आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी ओझर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे जलदगतीने तपास करत चोरीचा गुन्हा उघडकीस आणला. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी पोलिसांच्या कार्याचे कौतुक केले असून धार्मिक स्थळांवरील सुरक्षेबाबतही पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

# परतूरात उपवर्गीकरणविरोधात आंबेडकरी समाजाचा एल्गार

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** परतूर येथे अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाविरोधात आंबेडकरी समाजाने मोठा मोर्चा काढून मुख्यमंत्री यांना निवेदन दिले. निवेदनाचा मुख्य गाभा "संविधानिक एकात्मता आणि सामाजिक न्यायाचे संरक्षण" हा आहे.

निवेदनातील ठळक आक्षेप उपवर्गीकरणाला विरोध हा आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कलम 341 अंतर्गत अनुसूचित जातींना दिलेली एकसंघ घटनात्मक ओळख उपवर्गीकरणामुळे धोक्यात येईल, यामुळे जाती-जातीत संघर्ष वाढून सामाजिक ऐक्य कमकुवत होईल.



उपवर्गीकरणाऐवजी सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक मागासलेपण दूर करण्यासाठी सरकारने ठोस धोरण राबवावे.

प्रमुख मागण्या

1. उपवर्गीकरण रद्द करा - प्रक्रिया तात्काळ थांबवावी 2. बदर आयोग अहवाल - न्या. अनंत बदर आयोगाचा अहवाल सार्वजनिक करावा 3. जातीनिहाय जनगणना - देश व राज्यात करावी 4. आरक्षणात वाढ - लोकसंख्येनुसार अनुसूचित जातींच्या आरक्षणात वाढ करावी 5. अनुशेष भरा - शासकीय-निमशासकीय सेवांमधील SC-ST अनुशेष तात्काळ भरावा 6. आरक्षण कायदा - अंमलबजावणी न करणाऱ्यांवर अॅट्रॉसिटी अंतर्गत कारवाईचा कायदा करावा 7. मातंग समाज आयोग - लहुजी साळवे आयोगाच्या शिफारसी उपवर्गीकरण वगळून लागू करा 8. व्यापक चर्चा करा - कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व घटकांशी चर्चा, सामाजिक अभ्यास व्हावा 9. विभाजन नको - SC समाजात मतभेद निर्माण करणारे धोरण आणू नये 10. कल्याणकारी योजना - आरक्षणात विभागणी न करता स्वतंत्र उपाययोजना राबवा भूमिका स्पष्ट"आमचा संघर्ष कोणत्याही समाजाविरोधात नसून संविधानिक हक्कांच्या संरक्षणासाठी आहे. सामाजिक न्याय, बंधुता आणि समतेच्या मूल्यांनुसार शासनाने निर्णय घ्यावा. अन्यथा राज्यभर तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन उभारले जाईल."बाबासाहेबांच्या "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या संदेशाने प्रेरित होऊन हा लढा संविधान बचावासाठी उभारल्याचे आंबेडकरी विचार मंच परतूरच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी मोठ्यासंख्येने शिवभक्त किल्ले रायगडावर जाणार

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती दुर्गराज रायगड च्या वतीने युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे यंदाही दिनांक ५ व ६ जून २०२६ रोजी दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत भव्य स्वरूपात आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांसह साजरा करण्यात येणार असल्याची माहिती



शिवराज्याभिषेक महोत्सव समितीचे सदस्य छगन शेरे यांनी दिली.शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास आणि दुर्गराज रायगडाचे ऐतिहासिक महत्त्व प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचत असल्याने दुर्गराज रायगडवर शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी शिवभक्तांच्या संख्येत दरवर्षी मोठीवाढ होत असुन या उत्सवाला लोकोत्सवाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. यावर्षीच्या सोहळयाच्या पार्श्वभूमीवर समितीच्या विविध ४० उपसमित्या कार्यरत असून संपूर्ण नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे. स्वयंसेवक, वाहतूक व्यवस्था, अन्नछत्र, स्वच्छता, निवास व्यवस्था, नियोजन मंडळ आदी बाबींची तयारी झाली असुन शिवराज्याभिषेक सोहळ्यात सहभागी होणाऱ्या शिवभक्तांची मोठी संख्या लक्षात घेता, गडाच्या पायथ्याशी दोन आणि गडावर दोन ठिकाणी अन्नछत्राची व्यवस्था करण्यात येणार आहे. रायगडावर होणारा हा शिवराज्याभिषेक सोहळा म्हणजे खऱ्या अर्थाने एक विराट लोकोत्सव असून, हा अभूतपूर्व सोहळा डोळ्यात साठवण्यासाठी शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन छगन शेरे यांनी केले आहे.

# लाखाळ्यात गुन्हेगारीविरोधात वंचितचा बिगुल; किरणताई गिऱ्हे यांनी थेट पोलीस अधीक्षकांना घातली साद!

**चेन स्नॅचिंग, पाकीटमारी व चोरीच्या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण; पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे व पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांची सकारात्मक भूमिका**

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशिम शहरातील लाखाळा परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या चेन स्नॅचिंग, पाकीटमारी, चोरी आणि इतर गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या गंभीर प्रश्नावर आता वंचित बहुजन आघाडीने आक्रमक भूमिका घेतली आहे. परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी पोलीस चौकी स्थापन करण्यात यावी, अशी जोरदार मागणी वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश सदस्य सौ. किरणताई गिऱ्हे (भांदुर्गे) यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून लाखाळा परिसरात महिलांच्या गळ्यातील सोन्याच्या साखळ्या हिसकावून नेणे, पाकीटमारी, दुचाकी चोरी तसेच विविध प्रकारच्या गुन्हेगारी घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच मॉर्निंग वॉक व इव्हिनिंग वॉकसाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. अनेक महिलांना चेन स्नॅचिंगच्या घटनांमध्ये दुखापत झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

लाखाळा परिसर हा शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, व्यापारी प्रतिष्ठाने आणि मोठ्या लोकवस्तीमुळे कायम गजबजलेला असतो. मात्र अशा गर्दीच्या भागातही गुन्हेगार शिताफीने आपले हात साफ करत असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे या भागात स्वतंत्र पोलीस चौकीची मागणी दिवसेंदिवस जोर धरत आहे.

या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीच्या जिल्हाध्यक्ष सौ. किरणताई गिऱ्हे यांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांची भेट घेऊन नागरिकांच्या भावना मांडल्या. वाढत्या गुन्हेगारीमुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती त्यांनी अधोरेखित केली. नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीने प्रभावी उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी यावेळी केली.

जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे यांनी या निवेदनाची गंभीर दखल घेत नागरिकांच्या समस्या काळजीपूर्वक ऐकून घेतल्या. वाशिम जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले पोलीस अधीक्षक खाटमोडे यांनी लाखाळा परिसरातील परिस्थितीबाबत सकारात्मक भूमिका घेत आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या संवेदनशील आणि तत्पर भूमिकेमुळे नागरिकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.





याचबरोबर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांच्याशीही किरणताई गिऱ्हे यांनी सविस्तर चर्चा केली. परिसरातील चोरी, चेन स्नॅचिंग व इतर गुन्हेगारी घटनांबाबत माहिती देत अधिक गस्त, संशयितांवर लक्ष आणि गुन्हेगारांविरुद्ध कठोर कारवाईची मागणी करण्यात आली. पोलीस निरीक्षक संजय चौधरी यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा अधिक प्रभावी करण्याचे आश्वासन दिले.

सामाजिक प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवणाऱ्या किरणताई गिऱ्हे या महिला, सर्वसामान्य नागरिक आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी नेहमीच संघर्ष करताना दिसतात. महिलांवरील अन्याय, नागरिकांच्या मूलभूत समस्या तसेच सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर त्यांनी अनेकदा प्रशासनाचे लक्ष वेधले आहे. लाखाळा परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्नही त्यांनी तितक्याच ताकदीने मांडल्याने नागरिकांकडून त्यांच्या भूमिकेचे स्वागत होत आहे.

लाखाळा परिसरातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासाठी पोलीस प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक संघटनांनी एकत्रितपणे पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे. पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे, पोलीस निरीक्षक संजय चौधरी आणि वंचित बहुजन आघाडीच्या किरणताई गिऱ्हे यांच्या पुढाकारामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा हा महत्त्वाचा प्रश्न लवकरच मार्गी लागेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**लाखाळा परिसरातील वाढत्या गुन्हेगारी घटनांची गंभीर दखल घेत नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासन कटिबद्ध असून नागरिकांच्या सहकार्याने गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवले जाईल.**

**– श्री.निकेश खाटमोडे**
**जिल्हा पोलीस अधीक्षक, वाशिम**

**लाखाळा परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी अधिक गस्त, संशयितांवर लक्ष आणि गुन्हेगारीविरोधात प्रभावी कारवाई करण्यात येईल. नागरिकांनीही कोणतीही संशयास्पद माहिती तातडीने पोलीस प्रशासनाला द्यावी.**

**– श्री.संजय चौधरी**
**पोलीस निरीक्षक, शहर पोलीस ठाणे, वाशिम**

**महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न हा केवळ एका परिसराचा नाही तर समाजाच्या सुरक्षित भविष्याचा प्रश्न आहे. नागरिकांच्या हक्कांसाठी आणि सुरक्षेसाठी संघर्ष सुरूच राहणार आहे.**

**– किरणताई गिऱ्हे (भांदुर्गे)**
**जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश सदस्य, वंचित बहुजन आघाडी.**

## धुळीच्या साम्राज्यात लसीकरण! ग्रामीण रुग्णालय चिखलीतील गंभीर वास्तव उघड

**लहान बालकांच्या आरोग्याशी खेळ सुरू? दुसऱ्या मजल्यावरील अस्वच्छतेमुळे नागरिक संतप्त**

**दैनिक युवक आधार**

**बुलढाणा सिद्धार्थ धंदरे जिल्हा प्रतिनिधी** : शासन लहान बालकांचे आरोग्य सुदृढ राहावे, विविध आजारांपासून त्यांचे संरक्षण व्हावे यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून लसीकरण मोहीम राबवत आहे. मात्र चिखली येथील ग्रामीण रुग्णालयाच्या लसीकरण विभागाच्या दुसऱ्या मजल्यावर दिसून येणारी अस्वच्छता आणि धुळीचे साम्राज्य अनेक गंभीर प्रश्न निर्माण करत आहे.

लसीकरणासाठी येणाऱ्या माता आपल्या चिमुकल्यांना घेऊन या विभागात येतात. बालकांचे आरोग्य जपण्यासाठी ज्या ठिकाणी स्वच्छता आणि निर्जंतुकीकरणाला सर्वोच्च प्राधान्य असायला हवे, त्याच ठिकाणी धूळ, घाण आणि दुर्लक्षाचे चित्र पाहायला मिळत असल्याने पालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

रुग्णालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील कॉरिडॉरमध्ये धुळीचे थर साचलेले दिसून येत आहेत. त्यामुळे हा शासकीय दवाखाना आहे की एखादे ओसाड पडलेले भवन, असा सवाल सर्वसामान्य नागरिक उपस्थित करत आहेत. विशेष म्हणजे लसीकरणासाठी आलेल्या



महिलांना आत बसण्याची व्यवस्था असली तरी त्यांच्यासोबत आलेल्या वडिलांना तासनतास बाहेर उभे राहावे लागत असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे.

याशिवाय पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सुविधा नसल्याची तक्रार असून, बाहेर थांबणाऱ्या नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था नाही. तसेच स्वच्छतागृहांच्या सुविधांचाही अभाव असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

या रुग्णालयातील स्वच्छतेची जबाबदारी नेमकी कोणाची? देखरेख कोण करत आहे? नियमित साफसफाई का होत नाही? नागरिकांसाठी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष का होत आहे? असे असंख्य प्रश्न आता जनतेतून उपस्थित केले जात आहेत.

आरोग्य विभागाने तात्काळ या परिस्थितीची दखल घेऊन दुसऱ्या मजल्यावरील स्वच्छता मोहीम राबवावी, बसण्याची व्यवस्था करावी, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

आता येत्या काही दिवसांत ग्रामीण रुग्णालय प्रशासन या गंभीर बाबींकडे लक्ष देणार का? धुळीचे साम्राज्य संपणार का? नागरिकांना मूलभूत सुविधा मिळणार का? तसेच स्थानिक आमदार आणि आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहणार का? याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

"लसीकरणासाठी येणाऱ्या चिमुकल्यांच्या आरोग्याशी तडजोड नको!"लहान बालकांना सुरक्षित वातावरणात आरोग्य सेवा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. लसीकरण केंद्रात स्वच्छता, पिण्याचे पाणी, बसण्याची व्यवस्था आणि स्वच्छतागृह यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर देत प्रशासनाने तातडीने सुधारणा करणे अपेक्षित आहे.

## निर्मल नगरीत संत गजानन महाराज मंदिराची स्वप्नपूर्ती; स्व.प्रभाकर राऊतदादांचे योगदान अविस्मरणीय- देवराव प्रधान

**दैनिक युवक आधार**

**नागपूर प्रतिनिधी राकेश यादव** : उमरेड मार्गावरील निर्मल नगरी येथील श्री संत गजानन मंदिरात देवराव प्रधान व त्यांच्या पत्नींचा सत्कार सुनील बालपांडे दादांनी केला तेव्हा प्रधान यांनी सांगितले की, निर्मल नगरी येथील श्री संत गजानन मंदिर हजारो भक्तांचे श्रद्धास्थान बनले असून या भव्य-दिव्य मंदिराच्या उभारणीत श्रद्धेय स्व.प्रभाकरराव राऊत (दादा) यांचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे संत गजानन महाराजांचे सुंदर व आकर्षक मंदिर उभे राहिले असून नागपूरातील "शेगावप्रती" म्हणून या परिसराची ओळख निर्माण झाली आहे. रघुजी नगर पोलीस क्वार्टर परिसरातील श्री संत गजानन महाराज मठात 1983 ते 2017 या कालावधीत सलग 35 वर्षे श्रींचा प्रकटदिन उत्सव साजरा करण्यात येत होता. त्यानंतर 2018 पासून



निर्मल नगरीतील नव्या भव्य मंदिरात हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. मंदिर परिसरात संत गजानन महाराजांच्या मूर्तीसह विविध देवतांच्या आकर्षक मूर्ती स्थापित करण्यात आल्या तसेच पारायण कक्ष, साधना कक्ष, ध्यान कक्ष आणि श्रींचे विश्रामस्थळ यांचाही समावेश मंदिरात करण्यात आला आहे. मंदिर हे दररोज सकाळी 6 ते रात्री 9-10 वाजेपर्यंत दर्शनासाठी खुले असतात. प्रत्येक गुरुवारी सायंकाळच्या आरतीनंतर महाप्रसादाचे आयोजन केले जाते, तर एकादशीला नियमितपणे भजन केले जातात. आध्यात्मिक जीवनात सद्गुरूंचे महत्त्व अधोरेखित करताना मंदिर व्यवस्थापनाचे म्हणणे आहे की, देवाला शरण गेल्यास संपत्ती व समृद्धी मिळते, मात्र सद्गुरूंना शरण गेल्यास भगवंताची प्राप्ती होते. "सद्गुरुविना ज्ञान नाही, ज्ञानाविना शांती नाही आणि शांतीविना आनंद नाही," हा संदेश मंदिरातील विविध उपक्रमांतून दिला जातो. स्व. प्रभाकर राऊत दादा यांच्या स्मरणार्थ मंदिरात वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यामध्ये प्रकटदिन उत्सव, पुण्यतिथी, श्रीराम नवमी, गुरुपौर्णिमा, आषाढी एकादशी, नागपूर-शेगाव व नागपूर- कोराडी दिंडी यात्रा, जळगाव जामोद-शेगाव पालखी यात्रा तसेच दर महिन्याच्या शेवटच्या रविवारी सामूहिक पारायण मंडळाचे आयोजन केले जाते. याशिवाय आरती, भजन, भक्ती सत्संग यांसारखे कार्यक्रम नियमितपणे पार पडतात. मंदिराच्या धार्मिक आणि सामाजिक कार्यात ट्रस्टचे पदाधिकारी, सेवेकरी आणि भक्तगण सातत्याने योगदान देत असून त्यांच्या सेवाभावामुळे निर्मल नगरीतील संत गजानन महाराज मंदिर हे नागपूरच्या आध्यात्मिक जीवनातील एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. गुरुवारी निर्मल नगरीत देवराव प्रधान व त्यांच्या पत्नींचा सत्कार करतेवेळी श्री सुनील दादा बालपांडे, सुरेश रोकडे, राजकुमार चोपकर, मोहनदादा वैरागडे आणि दिपक प्रभाकर राऊत यांची उपस्थिती होती.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतनाचा वर्षाव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (हरेश साठे) :** दानशूर व्यक्तिमत्व आणि समाजाच्या हृदयात अधिराज्य गाजवणारे थोर समाजसेवक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या वयाची ७५ वर्षे अर्थात अमृत महोत्सवी वर्षे पूर्ण केली. त्यानिमित्त आज (दि.०२) त्यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, अध्यात्मिक, साहित्य, वैद्यकीय, सांस्कृतिक, विधी, कला, सांस्कृतिक, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर, कार्यकर्ते आणि नागरिकांनी अभिष्टचिंतन करून निरोगी दीर्घायुष्याच्या शुभेच्छा दिल्या.

समाजसेवा, दातृत्व, नेतृत्व आणि लोककल्याणाचा अखंड वसा जपत रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, थोर देणगीदार, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या जीवनातील ७५ वर्षांचा अमृतमहोत्सवी टप्पा पूर्ण केला आहे. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, सांस्कृतिक, कला, क्रीडा आणि जनहिताच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून जनमानसात अढळ स्थान निर्माण केले आहे. गरजू, वंचित आणि कष्टकरी घटकांना आधार देत शिक्षण, आरोग्य आणि समाजविकासासाठी त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी आणि अनुकरणीय मानले जाते. साधेपणा, विनम्रता आणि सर्वसामान्यांप्रती असलेली आत्मीयता यांमुळे ते केवळ राजकीय नेते म्हणून नव्हे, तर जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणारे खरे लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध स्तरांतून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला असून



समाजसेवेच्या या प्रदीर्घ, समर्पित आणि प्रेरणादायी प्रवासाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन झाले. पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथे भव्य स्वरूपात हा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय, राजकीय, सांस्कृतिक, साहित्य, क्षेत्रातील योगदान अनन्य साधारण आहे. राजकीय व आर्थिक शक्ती लोक कल्याणासाठी सार्थकी लावणारे लोकनेते म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांचा माणसावर अधिक विश्वास आहे. त्याचबरोबर सामान्य माणसाला काय हवे याची जाणीव त्यांना कायम राहिली. स्वतःच्या खिशातून जास्तीत जास्त मदतीचा हात देण्याचा प्रयत्न त्यांनी कायम ठेवला आहे. वयाच्या ७५ वर्षीही त्याचे सामाजिक कार्य अखंडपणे सुरूच आहे त्यामुळे सर्व क्षेत्रात आणि तळागाळातही त्यांच्या विचारांचा पगडा कायम आहे. विविध क्षेत्रातील योगदान आणि दानशूरता यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांना समाजाने "लोकमान्य लोकनेता" अशी उपाधी बहाल केली आहे. त्यांचा आदर्श घेऊन हजारो जणांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. सामान्य माणूस त्यांचा केंद्रबिंदू राहिला आहे, त्यामुळे प्रत्येक माणसाच्या मनात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी घर केले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जात, पात, धर्म, पक्ष असा कधीही भेदभाव मानला नाही. आपल्याकडून जेवढी मदत करता येईल तेवढी करायची आणि त्यामुळे माणुसकी हाच त्यांचा धर्म कायम राहिला आहे. त्यामुळे लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लोकांप्रती असलेली त्यांची समर्पण भावना खऱ्या अर्थाने सुवर्ण अक्षराचे पान आहे. त्यांची कीर्ती महान आणि सर्व समाजाला मार्गदर्शक आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे आधारवड असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी हितचिंतकांची हजारोंच्या संख्येत अर्थात अफाट गर्दी केली होती. दरम्यान अमृत महोत्सवी वर्ष प्रचंड प्रमाणात विविध समाजोपयोगी उपक्रमाने साजरा झाला. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि राज्यातील मंत्री महोदय गणेश नाईक, भरतशेठ गोगावले, आदितीताई तटकरे, खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, तसेच कोकणातील सर्व आमदार आणि विविध क्षेत्रातील हजारो मान्यवर, लोकप्रतिनिधी आणि दहा हजारहून नागरिक हितचिंतकांच्या उपस्थितीत (१३ मे) लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा उलवे नोडमध्ये भव्य असा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न झाला. तसेच वर्षभरात झालेल्या कार्यक्रमात भव्य कीर्तन महोत्सव, जिल्हास्तरीय भजन स्पर्धा, रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, महिलांसाठी कर्करोग तपासणी विशेष शिबीर, रोजगार मेळावा, शिधा वाटप, नाट्य महोत्सव, वृक्षारोपण, ७५ अभंगांचे लोकार्पण, आगरी कोळी महोत्सव, श्रीरामार्पण सांस्कृतीक सोहळा, संगीत मॅरेथॉन, व्याख्याने, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन शिबीर, गुणवंत विद्यार्थ्यांचे सत्कार, अभिनय स्पर्धा, कमी संमेलन, परिसंवाद, सन्मान सोहळा, सामूहिक बासरी वादन, निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धा, प्रोग्रॅम कार्ड डेकोरेशन, राज्यस्तरीय निवड कबड्डी स्पर्धा आणि प्रशिक्षण, विमा पॉलिसी वाटप, बॅडमिंटन स्पर्धा, बॉक्सिंग स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, अशी विविध कार्यक्रम उत्कृष्ट आयोजनात पार पडली. विशेष म्हणजे एवढ्या मोठ्या प्रमाणात सामाजिक कार्यक्रम आयोजित करून अमृत महोत्सवी वर्षाचे अनन्य साधारण महत्व अधोरेखित झाले.

## सोन्याचे मंगळसूत्र आणि रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** गाडीच्या दरवाजाची काच फोडून 11 ग्राम वजनाचे मंगळसूत्र आणि पन्नास हजार रुपये चोरून नेल्याप्रकरणी एक जून रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 31 मे रोजी रात्रीच्या सुमारास महिंद्रा स्कॉर्पिओ वरील चालक हॉटेल ऋतिका बार अँड रेस्टॉरंट मुंब्रा पनवेल हायवे खुटारी गाव येथे पार्क करून ते हॉटेलमध्ये जेवणासाठी गेले. यावेळी चोराने त्यांच्या गाडीची काच फोडून दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

## मोलकरणीने चोरले दागिने

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** खारघर येथील घरातून पाच लाख 80 हजार रुपयांचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेल्याप्रकरणी मोलकरणी विरोधात खारघर पोलीस ठाण्यात 31 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.खारघर येथे राहणाऱ्या फिर्यादी यांच्या घरातील मोलकरीण हिने फिर्यादी घरी नसताना तिच्याकडील चावीचा वापर करून त्यांच्या घरातील बेडरूमच्या कपाटात ठेवलेले रोख रक्कम आणि चार तोळे वजनाचे दागिने चोरून नेले.

## लिंबू पाण्याचा स्टॉल लावल्यावरून केली मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** लिंबू पाण्याचा स्टॉल लावल्याचा राग मनात धरून 35 वर्षीय इसमाला मारहाण केल्याप्रकरणी आठ ते नऊ जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात एक जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आलासंदीप पडियाची हा सेक्टर 18, नवीन पनवेल येथे राहत असून त्यांचे मामा यांनी पनवेल रेल्वे स्टेशन या ठिकाणी लिंबू पाण्याचा स्टॉल लावल्याचा राग मनात धरून आरोपी यांनी त्यांना शिवीगाळ केली. यावेळी विकास गुंजाळ यांनी त्याच्या कानाखाली दगडाने मारून दुखापत केली. सचिन धोत्रे यांनी लाकडी बॅटने मारहाण केली. निलेश गुंजाळ यांनी डोक्यावर मारहाण केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

## दोन लाख एक हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** एपीके फाईल पाठवून मोबाईलचा ताबा घेऊन दोन लाख 11 हजार 800 रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात ईसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 31 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. रामचंद्र जाधव हे कामोठे येथे राहत असून आरोपीने तुमचे महानगर गॅस कनेक्शन बिल न भरल्यामुळे बंद होईल अशी भीती दाखवली आणि त्यांच्या व्हाट्सअप क्रमांकावर एपीके फाईल पाठवली. ती फाईल ओपन केली असता जाधव यांच्या मोबाईलचा ताबा घेऊन आरोपीने त्यांच्या बँक खात्यातून दोन लाख एक हजार आठशे रुपये रक्कम टप्प्याटप्प्याने वेगवेगळया बँक खात्यात ऑनलाईन ट्रान्सफर करून त्यांची फसवणूक केली.

# पंतप्रधान मोदींच्या आवाहनाला प्रतिसाद: केऱ्हाळा येथे 'कृष्ण तुती' व दुर्मिळ वृक्षांचे रोपण

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच केलेल्या इटली दौऱ्यात, इटलीच्या पंतप्रधान जीओर्जी मेलोनी यांच्या समवेत मैत्रीचे व पर्यावरण रक्षणाचे प्रतीक म्हणून 'एक पेड माँ के नाम' मोहिमेअंतर्गत रोम शहरातील उद्यानात 'कृष्ण तुती' (ब्लॅक मलबेरी) या वृक्षाचे रोपण केले. त्यांनी भारतीयांनाही देशात याच्या रोपणाचे आवाहन केले होते. या आवाहनास प्रतिसाद देत, सिल्लोड येथील वनस्पती अभ्यासक व संघांचे सह-कार्यवाह डॉ. संतोष पाटील यांच्या मदतीने केऱ्हाळा येथील श्री. ज्ञानेश्वर माऊली वारकरी शिक्षण संस्थेच्या आवारात कृष्ण तुतीसह वारकरी संप्रदायात महत्त्व असलेल्या





सुवर्ण पिंपळ, बेल, मोह अशा ६ प्रजातींच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले.

**कृष्ण तुतीचे रहस्य व जगाला संदेश**

**प्राचीन काळी कुषान राजवटीत भारत व इटलीसह युरोपचा व्यापारी संबंध होता. त्यास 'सिल्क रूट' म्हणून ओळखले जाते. भारतातील रेशीम युरोपात जायचे. रेशीमचा किडा हा कृष्ण तुतीच्या झाडावर पाळला जातो. थोडक्यात, या झाडाचे प्राचीन नाते युरोपसोबत आहे. या वृक्षावर जेजेबल, निम्फा, कॉमन बेरॉन, मॉर्निंग क्लॉक, गौडी बेरॉन, रॉयल पिकॉक या प्रजातींची फुलपाखरे अंडी घालून जीवनक्रम सुरू करतात. अनेक पक्षी ही फळे खातात.**

**— डॉ. संतोष पाटील, वनस्पती अभ्यासक**

प्राचीन काळी युरोपात रेशीम वाहतूक करणारा मार्ग 'सिल्क रूट' म्हणून ओळखला जायचा. कालांतराने इराण तथा आखाती खाडीतून जलवाहतूक सुरू झाल्याने हा 'सिल्क रूट ' मागे पडला होता. आखाती देशांची मनमानी व युद्धजन्य परिस्थितीने हा सिल्क रूट जगास मोदींनी पुन्हा या एका झाडातून अवगत करून दिला. शेतकऱ्यांनी रेशीम उद्योगाला जोडधंदा करणेस प्रेरित व्हावे, हा संदेशही यात आहे.

या वेळी अमृतचे जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे, वारकरी संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प. देविदास महाराज मिसाळ यांनी या रोपांचे पालकत्व स्वीकारले. या वेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे जिल्हा व्यवस्थापक संदीप झालानी, कोकिळा माता मिसाळ, दादाराव एंडोले उपस्थित होते.

## महिलांच्या नावावर कर्ज, निधी मात्र दसऱ्याच्या खात्यात; फर्दापूर शाखेवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी विजय काळे** : सोयगाव तालुक्यातील वरखेडी (बु.) येथील महिला बचत गटांच्या कर्ज गैरव्यवहार प्रकरणाला नवे वळण मिळाले असून पंचायत समिती सदस्य राहुल राठोड यांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या फर्दापूर शाखेचे तत्कालीन व्यवस्थापक निखिल तायडे यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे. यासंदर्भात त्यांनी बँक प्रशासनाला लेखी निवेदन सादर केले आहे.वरखेडी (बु.) येथील रोशन महिला बचत गट व विराट महिला बचत गट यांच्या नावावर मंजूर झालेल्या कर्ज रकमेत गैरव्यवहार झाल्याचा आरोप यापूर्वी संबंधित महिलांनी केला होता. बचत गटातील महिलांच्या माहिती व संमतीशिवाय कर्ज प्रक्रिया पूर्ण करून प्रत्येकी दीड लाख रुपये असे एकूण तीन लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आल्याचा आरोप आहे.राहुल राठोड यांनी दिलेल्या निवेदनानुसार, समुदाय साधन व्यक्ती (सीआरपी) दाळीबाई राणीदास चव्हाण आणि तत्कालीन शाखा व्यवस्थापक निखिल तायडे यांनी संगनमत करून बनावट सह्या, कागदपत्रे आणि प्रक्रियेचा वापर करून हा व्यवहार केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पंचायत समितीने नेमलेल्या चौकशी समितीच्या अहवालातही सीआरपी दाळीबाई चव्हाण यांच्या गैरप्रकारांचा उल्लेख असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.निवेदनात पुढे म्हटले आहे की, कर्ज मंजुरीनंतर नियमानुसार बचत गटातील सर्व महिलांची उपस्थिती व संमती आवश्यक असताना ती न घेता कर्जाची संपूर्ण




**"महिला बचत गटाला कर्ज मंजूर करताना संबंधित सर्व सदस्यांच्या उपस्थितीत सह्या आणि छायाचित्रे घेणे बंधनकारक असते. मात्र या प्रकरणात कर्ज मंजुरी पत्रावर बनावट सह्या करण्यात आल्या. तसेच वास्तविक सदस्यांऐवजी इतर महिलांची छायाचित्रे वापरून कर्जाची रक्कम तिसऱ्या व्यक्तीच्या खात्यात वर्ग करण्यात आली. हा प्रकार अत्यंत गंभीर असून बँकेच्या कार्यपद्धती व विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा आहे. संबंधित महिला बचत गटाला न्याय मिळावा यासाठी बँक प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत."**

**— राहुल राठोड, पंचायत समिती सदस्य**

रक्कम राणीदास शांतीलाल चव्हाण यांच्या खात्यावर वर्ग करण्यात आली. त्यामुळे संबंधित महिला बचत गटांचे आर्थिक नुकसान झाले असून दोषींवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच चौकशी अहवाल तातडीने सादर करावा, अशी मागणी राठोड यांनी बँक प्रशासनाकडे केली आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून चौकशीच्या निष्कर्षाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## एमजीएम डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, नवी मुंबईतर्फे खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसरात जागतिक तंबाखूमुक्त दिन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** जागतिक तंबाखूमुक्त दिन 2026 निमित्त एमजीएम डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, नवी मुंबईच्या सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागातर्फे कॉलेज वर्किंग कमिटी, टोबॅको सेसेशन सेंटर (TCC) आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) युनिट यांच्या संयुक्त विद्यमाने खांदेश्वर रेल्वे स्थानक परिसरात जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचा उद्देश तंबाखू व निकोटीन व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी जनतेमध्ये जागरूकता निर्माण करणे हा होता. एमजीएम डेंटल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. श्रीवल्ली नटराजन आणि सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागाचे विभागप्रमुख डॉ. वैभव ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. इंटर्न्स, प्राध्यापक व कर्मचारी यांनी उत्साहाने रॅलीमध्ये सहभाग घेतला. जनजागृती फलकांच्या माध्यमातून तंबाखू सेवन बंद करण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. घोषणाबाजी व जनसंवादाच्या माध्यमातून तंबाखू सेवनामुळे होणारे धोके, विशेषतः मुखाचा कर्करोग व इतर गंभीर आरोग्यविषयक समस्या याबाबत माहिती देण्यात आली. "Unmasking the Appeal: Exposing Industry Tactics on Tobacco and Nicotine Products"




या संकल्पनेवर आधारित या कार्यक्रमाचा उद्देश नागरिकांना योग्य माहिती देऊन तंबाखूमुक्त जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहित करणे हा होता. हा कार्यक्रम एमजीएम डेंटल कॉलेज अँड हॉस्पिटल, नवी मुंबई आणि मराठवाडा ग्रामीण विकास संस्था, छत्रपती संभाजीनगर यांच्या सामुदायिक आरोग्य संवर्धन व तंबाखूजन्य आजारांविषयी जनजागृती निर्माण करण्याच्या बांधिलकीचे प्रतीक ठरला. कार्यक्रमामध्ये जनजागृती रॅली, फ्लॅश मॉब सादरीकरण, शैक्षणिक माहितीपत्रकांचे वितरण, शपथविधी, स्टिकर वितरण, मानवी साखळी निर्माण, स्वाक्षरी अभियान तसेच तंबाखूजन्य पदार्थ त्याग उपक्रम यांचा समावेश होता. कार्यक्रमात डॉ. भरत गुप्ता, डॉ. स्वाती सिंह, डॉ. सुजाता हिरावे, डॉ. सौरभ वाघाचौरे, डॉ. रागिनी सनाये आणि डॉ. मुनिथा पाटील या प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. तसेच अशैक्षणिक कर्मचारी श्रीमती स्मिता भीवंडकर व कु. प्रियांका जाधव यांनीही उपस्थिती दर्शविली.

## शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाने कामोठे वसाहतीमधील सतत खंडित होत असलेल्या विद्युत पुरवठ्याबाबत विचारला अधिकाऱ्यांना जाब

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर ) :** शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाने कामोठे वसाहतीमधील सतत खंडित होत असलेल्या विद्युत पुरवठ्याबाबत आज संबधीत अधिकाऱ्यांना जाब विचारला आहे . शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे सहसंपर्कप्रमुख अनिल चव्हाण व जिल्हाप्रमुख दीपक निकम यांच्या मार्गदर्शनाखाली महानगर प्रमुख ॲड. समाधान काशीद, उपमहानगर प्रमुख प्रभाकर गोवारी कामोठे शहर प्रमुख रामदास गोवारी, कामोठे उपशहर प्रमुख गणेश खांडगे व राहुल यादव पदाधिकारी आणि महावितरण अधिकारी यांच्या उपस्थितीत कामोठे मधील सतत खंडित होत असलेल्या विद्युत



पुरवठा संदर्भात बैठक पार पडली. यावेळी महावितरनाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता वेंकटेश कासल , बकुल मानवटकर ,संतोष पालवे, संजय मुंडे, सुजीत पाटील,

अभिजित साळवी हे उपस्थितीत होते. सदर बैठकीत महावितरणच्या चुकीच्या धोरणामुळे व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे नागरिकांना होत असलेल्या त्रासाबाबत तसेच सतत कामोठेमध्ये खंडित होत असलेल्या वीज पुरवठ्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत यावेळी श्री कासल यांनी कामोठ्याच्या लोड शेडिंगची समस्या एका आठवड्याच्या आत संपणार असल्याचे व पर्याय व्यवस्था उपलब्ध करत असल्याचे सांगण्यात आले व यापुढे नैसर्गिक कारणा व्यतिरिक्त कामोठे येथील लाईट बंद करणार नसल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच जरी लाईट बंद करणार असल्यास किंवा अचानक लाईट बंद केल्यास त्वरित ग्राहकांना सूचना देण्यात येईल असे सुद्धा आश्वासन देण्यात आले. यावेळी पावसाळ्या अगोदर संपूर्ण कामोठे शहरांमधील ज्या ज्या ठिकाणी झाडांच्या फांद्या वाढल्या मुले लाईटला धोकादायक असेल याची पेट्रोलिंग करून माहिती घेण्यास सांगण्यात आले.

## आस एक स्वप्न जे फक्त डोळ्यांतच नाही तर मनाच्या प्रत्येक कोपऱ्यात जिवंत होतं

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत :** आस एक स्वप्न... जे फक्त डोळ्यांतच नाही तर मनाच्या प्रत्येक कोपऱ्यात जिवंत होतं.

आयुष्याच्या प्रवासात ते स्वप्न नेहमी समोर उभं दिसत राहिलं. अनेक वळणं आली, अनेक संकटं आली, पण स्वप्नाच्या दिशेने चालणारी पावलं कधी थांबली नाहीत.

कधी पडलो, कधी स्वतःलाच सावरलं... पण आपण निवडलेला मार्ग योग्य आहे, हा विश्वास मात्र कायम ठेवला.या प्रवासात काही आपल्या माणसांनीच वाटेत काटे पसरवले, तर काही अनोळखी लोकांनी योग्य वेळी योग्य मार्गदर्शन करून आयुष्याचा नकाशाच तयार करून दिला.आणि मग सुरू झाला एक वेगळाच प्रवास...

डिजिटल युगात जिथे लोक फक्त reel scroll करण्यात व्यस्त आहेत, तिथे आम्ही आयुष्याचा विचार करत स्वप्नांना उंच भरारी देत होतो.डिजिटल माध्यमातून आमची ओळख लोकांपर्यंत पोहोचत होती आणि मेहनत, जिद्द व प्रामाणिकपणाने काय मिळवता येतं, हे आम्ही अनुभवत होतो.जिथे मेहनत करण्याची इच्छा असते, तिथे यश आणि समाधान दोन्ही मिळतात, हे आम्ही सिद्ध करून दाखवलं.स्वप्न फक्त डोळे बंद करून पाहायची नसतात...ती डोळे, मन, बुद्धी, योग्य विचार आणि योग्य मार्गदर्शन यांच्या जोरावर पूर्ण करायची असतात.



काहीतरी करून दाखवण्याची जिद्द माणसाला यशाचं शिखर नक्की दाखवते.अशाच एका मोठ्या स्वप्नाला घेऊन, नवनवीन विचार आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या साथीने,"AI पाणी पुरी सेंटर" ने स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.आज हा फक्त व्यवसाय नाही,

तर मेहनत, विश्वास आणि स्वप्नांच्या प्रवासाची एक प्रेरणादायी कहाणी बनली आहे.उद्याच्या काळात अजून मोठ्या उंचीवर जाण्याचं स्वप्न डोळ्यांत घेऊन हा प्रवास असाच सुरू राहणार आहे...स्वप्न पाहा... जिद्दीने जगा... आणि स्वतःची ओळख स्वतः निर्माण करा."

**लेख रवी सावंत.**

# खत खरेदीसाठी 'एफएसएएस' ॲप अनिवार्य; शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते विनाविलंब, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने मिळावीत, यासाठी कृषी विभागाने नवीन प्रणाली लागू केली आहे. आता खत खरेदीसाठी 'एफएसएएस' (FSAS) ॲपद्वारे नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांनी तातडीने हे ॲप डाऊनलोड करून खताची मागणी नोंदवावी, असे आवाहन पंचायत समितीच्या सभापती अनिताताई सुरेश बनकर यांनी केले आहे.

नोंदणी प्रक्रिया आणि क्यूआर (QR) कोडचे महत्त्व:

शेतकऱ्यांनी ॲप डाऊनलोड केल्यानंतर स्वतःचा [आधार क्रमांक] व फार्मर आयडी (Farmer ID) नोंदवून जमिनीचा तपशील प्रणालीवर अद्ययावत करावा. त्यानंतर पिकांची नोंदणी करून, गरजेनुसार खतांची मात्रा नमूद करणे आवश्यक आहे. खताची नोंदणी पूर्ण होताच, खते खरेदी करायच्या किरकोळ दुकानाची निवड करावी. ही प्रक्रिया पूर्ण होताच ॲपवर एक क्यूआर (QR) कोड जनरेट होईल.

खत खरेदी करताना हा क्यूआर कोड संबंधित दुकानदाराला दाखवणे अनिवार्य आहे. शेतकरी स्वतः खत खरेदी करणार की प्रतिनिधीमार्फत, याची माहितीही ॲपमध्ये नोंदवणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या खतांसाठी स्वतंत्र क्यूआर कोड मिळतील. तांत्रिक अडचणी (उदा. इंटरनेट नेटवर्क समस्या) टाळण्यासाठी, प्राप्त क्यूआर कोड फोनच्या गॅलरीत 'सेव्ह' करून ठेवणे सोयीचे ठरेल. खत खरेदी करताना हा कोड दाखवल्यानंतरच नोंदणीकृत खते मिळतील.ॲप वापराबाबत किंवा नोंदणीबाबत काही तांत्रिक अडचणी असल्यास शेतकऱ्यांनी पंचायत समिती सिल्लोड येथील कृषी विभाग किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, अशी माहिती गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी दिली आहे. खते वेळेत मिळावीत म्हणून सर्व शेतकरी बांधवांनी या नवीन प्रणालीचा अवलंब करावा, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना:**

नोंदणी अनिवार्य: खत खरेदीसाठी 'एफएसएएस' ॲपवरील नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आता बंधनकारक आहे.

सुरक्षितता: नोंदणीनंतर मिळणारा क्यूआर कोड फोनमध्ये 'सेव्ह' करून ठेवा, जेणेकरून नेटवर्क नसतानाही खरेदी सुलभ होईल.

प्रतिनिधी माहिती: खत खरेदीसाठी स्वतः जाणार की प्रतिनिधी पाठवणार, याची नोंद ॲपमध्ये आधीच करा.

मदत: तांत्रिक अडचण असल्यास तालुका कृषी अधिकारी कार्यालय, सिल्लोड यांच्याशी त्वरित संपर्क साधावा.

## दादर पश्चिम येथील वन वे बद्दल स्थानिकांचा आक्षेप

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी:- मयुर धुरी ( दादर मुंबई)** : दादर पश्चिम येथील भवानी शंकर रोड येथे वाहतूक पोलिसांनी लागू केलेल्या वन-वे व्यवस्थेमुळे दादरकरांसह परिसरातील नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. नागरिकांच्या सातत्याने येणाऱ्या तक्रारींची दखल घेत आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने नागरिकांच्या सह्यांची मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेद्वारे नागरिकांच्या भावना आणि मागण्या वाहतूक पोलिस प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. नागरिकांना होणारी गैरसोय लक्षात घेता भवानीशंकर रोडवरील वन-वे व्यवस्था रद्द करून हा मार्ग पुन्हा दुतर्फा (Two-Way) वाहतुकीसाठी खुला करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

या रास्त मागणीला वाहतूक पोलिस प्रशासन सकारात्मक प्रतिसाद देतील आणि योग्य निर्णय घेतील असा विश्वास यावेळी शिवसेना लोकप्रतीनिधी आणि या मोहिमेत सामील झालेल्या नागरिकांनी आमच्याशी बोलताना नोंदवल्या.





# पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या; पत्रकार संजीव भांबोरे यांच्या सामाजिक उपक्रमांतर्गत 9 जून ला विविध सामाजिक क्षेत्रातील 72 व 4 गुणवंत विद्यार्थी यांचा होणार सत्कार

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** --सन्मान द्या व सन्मान घ्या या सामाजिक उपक्रमांतर्गत प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळा कार्यक्रम प्रसंगी 9 जून 2026 ला सकाळी 11वाजता सम्यक बुद्ध विहार पहेला या ठिकाणी विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा सत्कार व गुणवंत विद्यार्थी सत्कार व सांस्कृतिक रंगारंग कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटक दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचे मुख्य संपादक व ज्ञानपंख न्यूज चैनल चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर यांच्या हस्ते होणार आहे .कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी खासदार खुशाल बोपचे राहणार आहेत. विशेष आकर्षक म्हणून फिल्म अभिनेते अश्विन कुमार वघाले, अभिनेत्री चैताली भस्मे, नृत्यांगना वैशाली मडावी, ज्येष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत छत्रपती संभाजीनगर, प्रकाश सोनवणे पुणे ब्ल्यू स्टार्म न्यूज चैनल चे मुख्य संपादक ,संविधान बचाव संघर्ष समितीचे भंडारा जिल्हा अध्यक्ष रोशन जांभुळकर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्णे, सरपंच शिवशंकर मुंगाटे अड्याळ,अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश पारधी,प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात एकूण 72 सामाजिक व 4 गुणवंत विद्यार्थी असे एकूण 76 कार्यकर्त्यांचा , अधिकारी कर्मचारी, गुणवंत विद्यार्थी यांच्या वरील मान्यवरांच्या उपस्थितीत शाल, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, मानाचा फेटा, पुष्पगुच्छ देऊन, सत्कार करण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने इंजिनीयर रूपचंद रामटेके भंडारा ,उमेश बोरकर प्रबोधनकार सातलवाडा साकोली ,मंगेश जनबंधू कृषी केंद्र पहेला ,परवेज मेश्राम कवी भंडारा ,प्रमोद राऊत नायब तहसीलदार पवनी, प्राध्यापक सुरेश गोंडाने गांधी विद्यालय पहेला ,अरुण खराबे कारकून पहेला ,एस एम पठाण पंचायत अधिकारी वळद,

नीलकमल गोंडाने प्रबोधनकार आंधळगाव मोहाडी ,नाशिक चवरे सामाजिक कार्यकर्ते पिंपरी भंडारा, शालिक लुटे ग्रामपंचायत अधिकारी रावणवाडी पहेला ,नथू शेंडे मंडल अधिकारी आड्याळ ,डॉक्टर अक्षय कहालकर भंडारा ,दिगंबर नंदेश्वर पत्रकार मोरगाव अर्जुनी गोंदिया



,दिनेश आजबले समाजसेवक चोवा,विजय नंदागवळी सामाजिक कार्यकर्ते साकोली ,शुभदा धुर्वे नायब तहसीलदार पवनी, मनोज गेडाम ग्रामपंचायत अधिकारी पहेला, राज बोरकर ग्रामपंचायत अधिकारी वळद जामगाव ,विलास बांडेबुचे सामाजिक कार्यकर्ता पहेला , रजत राऊत सामाजिक कार्यकर्ता अड्याळ, कुलदीप गंधे सामाजिक कार्यकर्ता निमगाव, यामिनी बांडेबुचे माजी जिल्हा परिषद सदस्या पहेला ,कुमारी संजना संजीव भांबोरे अँकरिंग ब्ल्यू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनल, गणेश पारधी अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ राष्ट्रीय उपाध्यक्ष ,जीवनबोधी बौद्ध संचालक शांतीवन बुद्ध विहार चिचाळ ,नरेंद्र मेश्राम पत्रकार लाखनी ,श्रीकृष्ण देशभ्रतार संपादक जनता कि आवाज तुमसर ,असीत बागडे समाजासेवक भंडारा ,वैशाली मडावी उर्फ लावण्या गडचिरोली, सतीश सोमकुवर प्रबोधनकार नागपूर ,चंद्रशेखर खराबे पोलीस पाटील पहेला , शितल नागदेवे प्रबोधनकार साकोली, डी जी रंगारी पत्रकार साकोली ,आशिष चेंडगे पत्रकार साकोली ,गणेश मलेवार भंडारा ,प्राध्यापक राजेश नंदपुरे चिचाळ, अमरकंठ बांडेबुचे इंजेवाडा, भीम शाहीर प्रदीप कडबे रामटेक,भीमशाहीर सदानंद मोरे अकोला, पौर्णिमा साखरे ग्रामपंचायत अधिकारी अड्याळ ,रामेश्वर पोहेकर अकोला प्रबोधनकार ,राजेश मेश्राम सामाजिक कार्यकर्ता पहेला , विकी पचारे पत्रकार अड्याळ , भावेश कोटांगले सुप्रसिद्ध प्रबोधनकार साकोली, रिंकू येळणे गुणवंत विद्यार्थी, तेजस बोंद्रे गुणवंत विद्यार्थी ,रोशन आंबेकर गुणवंत विद्यार्थी, कु. साक्षी मालवे गुणवंत विद्यार्थी,जयदेव देशमुख उद्योजक अड्याळ ,पूजा डी रंगारी अँकरिंग एशियन न्यूज चॅनेल रिपोर्टर साकोली, प्रमिला टेंभुकरर साकोली, पंकज रहांगडाले गोरेगाव,पत्रकार दुर्गेश राऊत साकोली ,तनुजा नागदेवे प्रबोधनकार साकोली आशिष करवाडे पहेला, अक्षय रविशंकर निमकर, डॉ यशवंत लांजेवार भंडारा,अनिल चचाने लाखनी, तारा सुरेश किन्हेकर हिंगणा नागपुर,, प्रशांत वंजारी ,रमेश रहांगडाले,भोलाराम तुरकर,,यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे सामाजिक कार्यकर्ता किंवा समाजासाठी विशेष योगदान आहे,

शासकीय कर्मचारी ,वकील, डॉक्टर ,इंजिनिअर, लेखक, कवी पत्रकार,व्यक्तींनी आयोजक प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या मोबाईल क्रमांक 7066370489 30 मे पूर्वी संपर्क साधावा.

त्यांनासुद्धा सन्मानचिन्ह ,प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ, मानाचा फेटा ,शाल ,देऊन सत्कार करण्यात येईल.

# आकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस; पेरणीपूर्व कामांना वेग !

**दैनिक युवक आधार**

**आकोट दिलीप कराळे प्रतिनिधी :** तालुक्यात सोमवार ला संध्याकाळी अचानक हवामानात बदल होऊन वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. गेल्या काही दिवसांपासून असह्य उकाड्याने त्रस्त असलेल्या नागरिकांना या पावसामुळे मोठा दिलासा मिळाला असून, परिसरात गारवा निर्माण झाला आहे. दरम्यान, या पहिल्याच दमदार पावसामुळे बळीराजा सुखावला असून तालुक्यातील पेरणीपूर्व शेतीच्या कामांना कमालीचा वेग आला आहे.

सोमवार ला संध्याकाळच्या सुमारास अचानक आकाश ढगांनी ओसंडून आले आणि सोसाट्याचा वारा सुटला. बघता बघता विजांच्या कडकडाटासह पावसाला सुरुवात झाली. तालुक्यात अनेक ठिकाणी



**"या पावसामुळे जमीन चांगली ओली झाली असून पेरणीसाठी शेत तयार करणे सोपे झाले आहे. जर मान्सून वेळेवर आला आणि पेरणी योग्य पाऊस झाला तर वेळेत पेरण्या आटोपतील -**
**वसंतराव डोबाळे,शेतकरी ताजनापूर**

मुसळधार तर काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. या अवकाळी पावसामुळे शहरातील मुख्य रस्त्यांवरून पाण्याचे पाट वाहू लागले होते, तर ग्रामीण भागातील सखल भागांत पाणी साचले होते.

पेरणी पूर्व पावसामुळे शेतकरी राजा सुखावला असून पेरणीपूर्व कामांची लगबग सुरू झाली आहे. मृग नक्षत्र लागण्यापूर्वीच झालेल्या या दमदार पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.वखरणी आणि नांगरणीला वेग आला असून पावसाने जमिनीत ओलावा निर्माण झाल्यामुळे रखडलेली शेतीची कामे आता जोमाने सुरू झाली आहेत. ढेकळे फुटण्यास मदत झाल्याने शेतकरी वखरणी आणि जमीन सपाटीकरणाच्या कामात व्यस्त झाले आहेत.

खते व बियाण्यांची खरेदी: पाऊस पडल्यामुळे शेतकऱ्यांनी आता कृषी केंद्रांवर खते आणि कापूस, सोयाबीन आदी बियाण्यांची खरेदी करण्यासाठी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे.वादळी वाऱ्यामुळे काही प्रमाणात नुकसान पिकाचे नुकसान झाले आहे.

पाऊस जरी सुखावणारा असला , तरी सुरुवातीला सुटलेल्या तीव्र वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील काही भागांत फळबागेची नुकसान झाले आहे.एकंदरीत, या पावसाने उकाड्यापासून सुटका करण्यासोबतच आगामी खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांचे मनोबल वाढवले आहे.

# मराठा आरक्षणाच्या आंदोलनात मृत्यू झालेल्या वारसांना नोकरी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई/प्रतिनिधी :** मराठा आरक्षणाच्या आंदोलना दरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या वारसदारांना औद्योगिक विकास महामंडळा मध्ये नोकरी देण्याचा महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकारने घेतला आहे.अंतरवाली सराटी येथील आंदोलना दरम्यान दिलेल्या आश्वासनाची कार्यवाही या निर्णयातून झाली असल्याचे मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

मराठा आरक्षण आणि वेगवेगळ्या मागण्यासाठी मनोज जरांगे यांनी केलेल्या विविध मागण्यामध्ये आंदोलकांच्या मृत वारसदारांना नौकरी देण्याच्या मागणीचा समावेश होता.सदर मागणीबाबत सामान्य प्रशासन विभागाने तातडीने शासन आदेश जारी करून मराठा आंदोलना दरम्यान मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या वारसदाराची पडताळणी करून प्रमाणपत्र देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांना देण्यात आले असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले.

काही दिवसांपुर्वी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन केले होते.उपोषण सोडते समयी मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी औद्योगिक विकास महामंडळा मध्ये मृत व्यक्तीच्या वारसदारांना नौकरी देण्याची कार्यवाही तातडीने करणार असल्याचे सांगितले होते. मृत आंदोलकांच्या वारसांना परिहवन महामंडळा मध्ये समाविष्ट करून घेण्याचे ठरले होते.मात्र काहीची अपेक्षा औद्यगिक विकास महामंडळ किंवा वीज वितरण कंपनी मध्ये आहे.त्यानूसार औद्यगिक विकास महामंडळात मृत व्यक्तींच्या वारसांना समाविष्ट करून घेण्याची कार्यवाही प्रशासकीय स्तरावर वेगाने झाली असून,औद्यगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत याबाबतचा निर्णय झाला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

औद्यगिक विकास महामंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानंतर सामान्य प्रशासन विभागाने सर्व जिल्हाधिकारी यांना पत्र पाठवून मृत आंदोलकांच्या पात्र वारसदारांची पडताळणी करून तातडीने प्रमाणपत्र देण्याच्या सूचना दिल्या आहेत. जिल्हाधिकारी यांनी अचूक,योग्य शहनिशा करून प्रमाणपत्र निर्गमित करण्याची कार्यवाही तात्काळ करण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याची माहीती मंत्री विखे पाटील यांनी दिली.

अंतरवाली सराटी येथील आंदोलना दरम्यान संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरकार करीत आहे. मराठा समाजाच्या मागण्याबाबत महायुती सरकार संवेदनशील असून यापुर्वी सकारत्मक निर्णय झाले.भविष्यातही समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी कटिबध्द आहोत.

**डॉ.राधाकृष्ण विखे पाटील**
**अध्यक्ष,मराठा आरक्षण उपसमिती**

महाविकास आघाडीच्या वतीने कांदा प्रश्नावर करण्यात येत असलेल्या आंदोलनावर प्रतिक्रीया व्यक्त करताना मंत्री विखे पाटील म्हणाले की,विरोधी पक्षाचे ते काम आहे.केंद्रीय मंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत महत्वपूर्ण निर्णय झाले.कांदा उत्पादकांना दिलासा देण्याची भूमिका केंद्र आणि राज्य सरकारची आहे.

# जीव धोक्यात, महावितरण निवांत! विष्णुनगरमध्ये धोकादायक झाडांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे, निफाड तालुका प्रतिनिधी :** विष्णुनगर गावातील अनेक वीजतारांवर धोकादायक झाडे आणि फांद्यांचा विळखा पडलेला असतानाही महावितरण प्रशासनाकडून याकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी मोठमोठी झाडे थेट मेन वीजवाहिनीला टेकलेली असून वारा आला की ती पूर्णपणे तारांवर झुकतात. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होण्याबरोबरच शॉर्टसर्किट, आग लागणे किंवा जीवितहानीची भीती निर्माण झाली आहे.

गावातील अनेक नागरिकांनी या समस्येबाबत वारंवार महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या आहेत. काही ठिकाणी अधिकाऱ्यांना



प्रत्यक्ष जागेवर नेऊन धोकादायक परिस्थिती दाखवून देण्यात आली. मात्र, अनेक महिन्यांपासून केवळ आश्वासने दिली जात असून झाडांची छाटणी किंवा हटविण्याबाबत कोणतीही प्रभावी कारवाई करण्यात आलेली नाही, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे.

गावापासून काही अंतरावरच महावितरणचे कार्यालय आणि उपकेंद्र (सब-स्टेशन) असतानाही गावातील वीजवाहिन्यांची अशी दयनीय आणि धोकादायक अवस्था दुर्लक्षित राहणे आश्चर्यकारक असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे. गावातील अनेक भागांमध्ये झाडांच्या फांद्या थेट वीजतारांवर टेकलेल्या दिसत आहेत. पावसाळा तोंडावर असताना आणि वादळी वाऱ्यांचा धोका वाढत असताना अशा झाडांची तातडीने छाटणी होणे आवश्यक असतानाही प्रशासनाकडून कोणतीही विशेष मोहीम राबविण्यात आलेली दिसत नाही.

ग्रामस्थांच्या मते, एखाद्या दिवशी जोरदार वारा किंवा पावसामुळे झाड कोसळून वीजतारा तुटल्या, शॉर्टसर्किट झाले किंवा एखाद्या निष्पाप नागरिकाचा जीव गेला, तर त्याची जबाबदारी कोण घेणार? नागरिकांच्या जीवाशी संबंधित इतका गंभीर प्रश्न असतानाही संबंधित विभागाकडून केवळ वेळकाढूपणा केला जात असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

महावितरण प्रशासनाने संभाव्य दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने गावातील सर्व धोकादायक झाडांची पाहणी करून त्यांची छाटणी अथवा हटविण्याची कार्यवाही करावी, तसेच वीजतारांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, अशी जोरदार मागणी आता विष्णुनगरकरांकडून होत आहे.

# दि ठाणे– पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी युवा नेतृत्व श्री . आकाश बाबाजी पाटील यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी :** ठाणे- पालघर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत ठाणे तालुका मतदारसंघातून युवा नेतृत्व श्री. आकाश बाबाजी पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. आज दि. २ जून रोजी छाननी चा दिवस असल्याने त्यांच्या विरुद्ध दुसरा अर्ज न आल्याने त्यांना बिनविरोध विजयी घोषित करणायत आले.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ जी शिंदे, संसदरत्न खासदार श्रीकांत जी शिंदे, कल्याण तालुकाप्रमुख गोपाळ जी लांडगे व कल्याण ग्रामीण चे आमदार राजेश जी मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने त्यांनी ही निवडणूक लढवली. त्यांच्या निवडीमुळे सहकार क्षेत्रात नव्या पिढीच्या नेतृत्वाला संधी मिळाल्याची भावना व्यक्त होत असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

श्री. आकाश पाटील हे उच्चशिक्षित, अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेले युवा नेतृत्व म्हणून ओळखले जातात. आधुनिक व्यवस्थापन, वित्तीय नियोजन आणि विकासाभिमुख विचारसरणी यांचा उत्तम समन्वय साधत त्यांनी सामाजिक, व्यावसायिक आणि सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. युवकांशी असलेला त्यांचा घनिष्ठ संपर्क, जनसामान्यांच्या प्रश्नांप्रती असलेली संवेदनशीलता आणि विकासासाठीची बांधिलकी यामुळे त्यांना सर्व स्तरांतून मोठा पाठिंबा लाभला.

श्री.आकाश पाटील यांचे आजोबा स्व. बाळाराम कान्हा पाटील हे १९८६ पासून ते २००८ पर्यंत बँकेवर संचालक मंडळावर होते. ते ४ वेळा अध्यक्ष होते व आकाश पाटील यांचे वडील श्री. बाबाजी बाळाराम पाटील हे २००८ ते २०२६ पर्यंत संचालक मंडळावर होते. ते दोन वेळा अध्यक्ष होते. आकाश पाटील यांच्या रूपाने पाटील कुटुंबीय ची तिसरी पिढी बँकेच्या राजकारणात सक्रिय झाली आहे.माजी अध्यक्ष श्री. बाबाजी





बाळाराम पाटील यांच्या मार्गदर्शनाचा वारसा लाभलेल्या आकाश पाटील यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पारदर्शक कारभार, शेतकरी व सभासद-केंद्रित धोरणे आणि बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी ठोस दृष्टीकोन मांडला आहे.

आपल्या निवडीबद्दल बोलताना श्री. आकाश पाटील यांनी सांगितले की, “ही निवड माझ्या वैयक्तिक यशाची नसून ठाणे तालुक्यातील सभासद, शेतकरी, सहकारी संस्था आणि सर्व कार्यकर्त्यांनी दाखविलेल्या विश्वासाचा विजय आहे. ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला अधिक सक्षम, आधुनिक, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनविण्यासाठी मी पूर्ण क्षमतेने कार्य करेन. युवा शक्ती, तंत्रज्ञान आणि सहकार यांचा संगम घडवून बँकेच्या प्रगतीस नवी दिशा देण्याचा माझा प्रयत्न राहील.”

त्यांच्या बिनविरोध निवडीमुळे बँकेच्या आगामी कार्यकाळात नाविन्यपूर्ण उपक्रम, डिजिटल बँकिंगचा विस्तार, शेतकरी व ग्रामीण भागासाठी अधिक प्रभावी आर्थिक सेवा तसेच युवकांना सहकार क्षेत्रात संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अर्चित भाऊ नाईक यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) प्रदेश उपाध्यक्षपदी निवड

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड प्रतिनिधी/सय्यद इसा** : महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशीकांत शिंदे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई शेख यांनी पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी किनवट, माहूर विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते अर्चित नाईक यांची नियुक्ती केली आहे. रविवारी दि. ३१ मे रोजी मुंबई येथील पक्ष कार्यालयात त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.




यावेळी जिल्हा कार्याध्यक्ष बंटी पाटील जोमदे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. या नियुक्तीमुळे माहूर, किनवट तालुक्यात पक्ष संघटनेत नवचैतन्य निर्माण होणार असून युवकांमध्ये पक्षाची ताकद अधिक वाढण्याची आपेक्षा व्यक्त केली जात आहे. दिवंगत स्वर्गीय आ. प्रदीप नाईक यांचा राजकीय वारसा लाभलेले अर्चित नाईक हे मागील १५ वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रियपणे कार्यरत आहेत. पक्षाच्या माध्यमातून जनसामान्यांचे प्रश्न मार्गी लावत खा. शरदचंद्र पवार, संसदरत्न खासदार सुप्रिया ताई सुळे आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांच्या विचारांना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याची जबाबदारी युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब भाई

शेख यांनी त्यांच्यावर सोपविली आहे. आगामी काळात ते पक्षाच्या वाढीसाठी प्रभावी काम करतील, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या बेबीताई नाईक यांनी व्यक्त केला. नियुक्तीबाबत प्रतिक्रिया देताना अर्चित नाईक यांनी, 'स्वर्गीय आ. प्रदीप नाईक यांचे आशीर्वाद आणि आमच्या नेत्या बेबीताई नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाला पूर्वीचे दिवस आणण्यासाठी जीवाचे रान करू," असा विश्वास व्यक्त केला.